**मे. आरसीसीपीएल प्रायव्हेट लिमिटेड, दुसरा मजला, इंडस्ट्री हाऊस, १५९, चर्चगेट रिक्लेमेशन, मुंबई -४०० ०२०, महाराष्ट्र या कंपनीव्दारे प्रस्तावित डोंगरगांव चुनखडी खाण, मौजे - डोंगरगांव, दहीगांव आणि वेगांव, तहसिल- वणी आणि मारेगांव, जिल्हा-यवतमाळ, महाराष्ट्र येथे एकूण एम. एल. २५२.३६ हेक्टर क्षेत्रात एकूण १.५२ दशलक्ष टन प्रतिवर्ष ROM (चुनखडी – ०.९ दशलक्ष टन प्रतिवर्ष, माती – ०.०६ दशलक्ष टन प्रतिवर्ष आणि ओबी – ०.५६ दशलक्ष टन प्रतिवर्ष) क्षमतेच्या चुनखडी खाणीच्या प्रकल्पाच्या उभारणी प्रस्तावाच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

---

मे. आरसीसीपीएल प्रायव्हेट लिमिटेड, दुसरा मजला, इंडस्ट्री हाऊस, १५९, चर्चगेट रिक्लेमेशन, मुंबई -४०० ०२०, महाराष्ट्र या कंपनीव्दारे प्रस्तावित डोंगरगांव चुनखडी खाण, डोंगरगांव, दहीगांव आणि वेगांव, तहसिल- वणी व मारेगांव, जिल्हा-यवतमाळ, महाराष्ट्र येथे एकूण एम. एल. २५२.३६ हेक्टर क्षेत्रात एकूण १.५२ दशलक्ष टन प्रतिवर्ष ROM (चुनखडी – ०.९ दशलक्ष टन प्रतिवर्ष, माती – ०.०६ दशलक्ष टन प्रतिवर्ष आणि ओबी – ०.५६ दशलक्ष टन प्रतिवर्ष) क्षमतेच्या चुनखडी खाणीच्या प्रकल्पाच्या उभारणी प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी दिनांक १७/०७/२०२३ रोजी सकाळी ११:०० वाजता प्रकल्प स्थळ मे. आरसीसीपीएल प्रायव्हेट लिमिटेड, डोंगरगांव चुनखडी खाण, मौजे - डोंगरगांव, दहीगांव, तालुका-वणी, जिल्हा-यवतमाळ, महाराष्ट्र येते आयोजित करण्यात आलेली होती.

बैठक सुरु होताना **श्री वासुदेव लक्ष्मणरावं विधाते, मुक्काम पोस्ट—मार्की मांगली, जिल्हा-यवतमाळः** यांनी आक्षेप नोंदविला की ही जनसुनावणीची वेळ ही ११:०० वाजताची असून आता बारा सव्वा बारा वाजले आहेत. सकाळी ११:०० ची वेळ असून अजूनही मा. जिल्हाधिकारीसाहेब आलेले नाहीत. जवळजवळ दीड तास येथे सामान्य जनता वाट पहात आहेत. येथे शेतकरी आलेले आहेत. त्यांना शेतात कामे आहेत. तरीही गेले दीड तास नुसते येथे बसून आहेत. तरी आपण या जनसुनावणीवर बहिष्कार टाकायचा, यास सर्व उपस्थितांनी मोठ्या आवाजात संमती दिली. यावेळी श्री विधाते यांनी आवाहन केले की मंडपात कोणीही थांबू नये. ही जनसुनावणी आपण रद्द समजायची आहे. तरी या जनसुनावणीत कोणीही भाग घेऊ नये. सर्वजणांनी त्यास मोठ्या आवाजात होकार दिला व बरेच लोक मंडपाबाहेर जाण्यासाठी उभे राहिले.

त्यावेळी उपस्थित श्री बोरकर, जिल्हाध्यक्ष – यवतमाळ, महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी आवाहन केले की जरी विद्यमान जिल्हाधिकारीसाहेब आले, तरी आपण येथे कोणीही थांबू नये. सर्वांनी त्यास पाठिंबा दिला. येथे सकाळी दहा वाजल्यापासून माझे कष्टकार येते आलेले आहेत. त्यांना बसायची व्यवस्था नाही. शेतीचे दिवस आहेत. प्रशासनास वेळेचे बंधन नसेल, तर आम्हांला गरज नाही. गरज ही यांना आहे. आम्ही आमची शेती वाहून अन्न पिकवून खाऊ. बाहेर पडणारे काही समहू/लोक घोषणा देत बाहेर पडले. त्यांनी घोषणा दिली की जमिन आमच्या हक्काची, नाही कुणाची. शेतकरी कृती समितीचा विजय असो ही घोषणा करत होते.

त्यावेळी श्री अमोल येडगे, भाप्रसे, जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे आगमन झाले. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती ही स्टेजवर स्थानापन्न झाल्यानंतर श्री उमाशंकर भादुले, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर यांनी मंडपाबाहेर उपस्थित असणाऱ्यांना मंडपात येऊन स्थानापन्न होण्याची सूचना केली.

श्री अमोल येडगे, भाप्रसे, जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की आज आरसीसीपीएल प्रायव्हेट लिमिटेड यांची पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आहे. बैठकीची वेळ ही ११:०० वाजता होती. मात्र जिल्हास्तरीय आपत्तीजनक परिस्थिती उद्भल्यामुळे मला थांबावे लागले, दूरध्वनीवरुन काही सूचना काही विभागांना द्याव्या लागल्या. त्यामुळे येथे येण्यास उशिर झाला. तरी आता ही जनसुनावणी सुरु करण्याची सूचना देत आहे. या प्रकल्पाचे स्थान डोंगरगाव, दहीगाव आणि वेगाव, तर तहसील/तालुका -- वणी व मारेगाव आहे. यवतमाळ जिल्ह्यातील दोन तहसीलमधील कंपनीचे स्थान आहे. प्रस्तावित चूनखडी उत्पादन क्षमता ही ०.९ दशलक्ष टन प्रती वर्ष आहे. आज १७ जुलै, २०२३ रोजी जनसुनावणी ठेवलेली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आदेश दिनांक ०५/०७/२०२३ नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रादेशिक अधिकारी, चंद्रपूर हे सदस्य तर उप प्रादेशिक अधिकारी-चंद्रपूर हे समन्वयक आहेत. तरी त्यांनी जनसुनावणी प्रक्रिया सुरु करण्याची सूचना देण्यात येत आहे.

श्री उमाशंकर भादुले, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री अमोल येडगे, भाप्रसे, जिल्हाधिकारी, यवतमाळ तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, सौ. हेमा देशपांडे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, उपस्थित शासकीय अधिकारी व कर्मचारी, प्रकल्पाचे अधिकारी व कर्मचारी, पत्रकार, पर्यावरणवादी यांचे स्वागत करुन सांगितले की प्रकल्प प्रवर्तक आरसीसीपीएल प्रायव्हेट लिमिटेड इंडस्ट्री हाऊस, दुसरा मजला, १५९, चर्चगेट रेक्लमेशन, मुंबई – ४०० ०२०, महाराष्ट्र यांचा त्यांच्या डोंगरगाव चुनखडीची खाण, गाव – डोंगरगाव, दहीगाव व देगाव, तहसील-वणी आणि मारेगाव, जिल्हा-यवतमाळ, महाराष्ट्र येथील एकूण आरओएम - १.५२ दशलक्ष टन प्रतिवर्ष ( चुनखडी- ०.९ दशलक्ष टन प्रतिवर्ष, माती – ०.०६ दशलक्ष टन प्रतिवर्ष आणि ओ.बी. – ०.५६ दशलक्ष टन प्रतिवर्ष) एमएल क्षेत्र -- २५२.३६ हेक्टर (खाजगी शेतजमिन) प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याचा अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाला.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग त्यातील यादी मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक २९/१०/२०२१ रोजी सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक ०३/१०/२०२२ रोजी प्रदान केली.

जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी प्रत्यक्ष (Physical) आणि आभासी/ऑनलाईन पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास सोमवार , दिनांक १७ जुलै, २०२३ रोजी सकाळी ११:०० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४/०९/२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१/१२/२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-४६ / २०२३ व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी २३०७०५- एफटीएस ००३४ दिनांक ०५/०७/२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी —<br>प्रादेशिक अधिकारी,चंद्रपूर,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>चंद्रपूर | - | **समन्वयक** |

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक दैनिक लोकमत (मराठी) व राष्ट्रीय वृत्तपत्र द हितवाद (इंग्रजी) १५/०६/२०२३ रोजी जनसुनावणीबाबत जाहिर सूचना व दिनांक १६/०६/२०२३ रोजी शुध्दिपत्र प्रकाशित करण्यात आलेले होते.

त्याचप्रमाणे या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१) पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, इंदिरा पर्यावरण भवन, जोरबाघ रोड, नवी दिल्ली-११०००३.
२) सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
४) उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५) जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ.
६) जिल्हा परिषद, यवतमाळ.
७) जिल्हा उद्योग केंद्र, यवतमाळ.
८) उप-विभागीय कार्यालय वणी, ता. वणी, जि. यवतमाळ.
९) तहसिल कार्यालय वणी, ता. वणी, जि. यवतमाळ.
१०) तहसिल कार्यालय मारेगांव, ता. मारेगांव, जि. यवतमाळ.
११) पंचायत समिती कार्यालय वणी, ता. वणी, जि. यवतमाळ.
१२) पंचायत समिती कार्यालय मारेगांव, ता. मारेगांव, जि. यवतमाळ.
१३) गट-ग्राम पंचायत कार्यालय डोंगरगांव, ता. वणी, जि. यवतमाळ.
१४) ग्राम पंचायत कार्यालय दहीगांव, ता. वणी, जि. यवतमाळ.
१५) ग्राम पंचायत कार्यालय वेगांव, ता. मारेगांव, जि. यवतमाळ.
१६) ग्राम पंचायत कार्यालय वीरकुंड, ता. वणी, जि. यवतमाळ.
१७) ग्राम पंचायत कार्यालय केगांव, ता. मरेगांव, जि. यवतमाळ.
१८) गट-ग्राम पंचायत कार्यालय मंगरूळ, ता. मारेगांव, जि. यवतमाळ.
१९) गट-ग्रामपंचायत कार्यालय कोलगांव, ता. मारेगांव, जि. यवतमाळ.
२०) गट-ग्रामपंचायत कार्यालय बोर्डा, ता. मारेगांव, जि. यवतमाळ.

वरिल अनुक्रमांक ०६ ते २२ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

आतापर्यंत या कार्यालयास ०५ निवेदने उपरोक्त प्रकल्पाविषयी प्राप्त झालेले आहेत. समन्वयक यांनी सांगितले की ज्यांना बैठकीत लेखी सूचना सादर करावयाच्या असल्यास त्या म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधीस सूपूर्त करण्यात याव्यात.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

समन्वयक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

समन्वयक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची सूचना व आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

समन्वयक यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रकल्पाविषयी सादरीकरण करण्याची सूजना केली.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बाहेर उपस्थित असलेल्या व्यक्तींना मंडपात येऊन स्थान ग्रहण करण्याची सूचना केली. त्यासाठी त्यांना पाच मिनिटे अवधी देण्यात आला. अध्यक्ष यांनी प्रकल्प प्रवर्तकांना पाच मिनिटांनी सादरीकरण करण्याची सूचना केली. समन्वयक यांनीसुध्दा मंडपाबाहेर बाहेर उपस्थित असलेल्या व्यक्तींना मंडपात येऊन स्थान ग्रहण करण्याची सूचना केली. प्रकल्प प्रवर्तक यांनीसुध्दा स्थानीकांना मंडपात बैठकीसाठी येण्याची सूचना केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उप विभागीय अधिकारी व मारेगाव आणि वणी गावाच्या तहसीलदारांना सूचना केली की मंडपाबाहेर मारेगाव व वणी तालुक्यातील संबंधित गावांमधून आलेल्या लोकांना मंडपात जाण्याची सूचना करावी. अध्यक्ष यांनी व्हिडिओग्राफरला आदेश दिले की तहसीलदार संबंधित गावातील लोकांना जनसुनावणीस मंडपात जाण्याची सूचना देत असताना त्याचे चित्रिकरण करण्यात यावे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की मंडपाबाहेर उभ्या असणा-या स्थानीक शेतकऱ्यांना बैठकीस बसण्याच्या सूचना करण्यात आलेल्या होत्या. त्यासाठी पाच मिनिटांचा अवधी देण्यात आलेला होता. आता दहा मिनिटे झालेली असून काही शेतकरी हे मंडपात आलेले आहेत. तरी अजून सहा मिनिटांचा अवधी शेतकऱ्यांना देण्यात येत आहे. आता १२:३४ मिनिटे झालेली असून १२:४० मिनिटांनी प्रकल्प प्रवर्तक हे सादरीकरण सादर करतील.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की स्थानीक व देशपातळीवरिल वृत्तपत्रात जनसुनावणीबाबत जाहिर सूचना प्रकाशित झाल्यानंतर देशातील, राज्यातील व स्थानिक गावांतील लोकांना मंडपात बैठकीसाठी येण्याची सूचना वारंवार करण्यात आली. अध्यक्ष यांनी सांगितले की सोळा मिनिटांपूर्वी उप विभागीय अधिकारी व वणी, मारेगाव सरपंचांना सूचना करण्यात आली की मंडपाबाहेर असलेल्या स्थानीक लोकांना व स्थानीक शेतकऱ्यांना बैठकीस मंडपात जाण्याची विनंती करण्याची सूचना देण्यात आली व त्याप्रमाणे ते विनंती करत आहेत. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी "बैठकीच्या इतिवृत्तात स्थानीकांना बैठकीसाठी मंडपात येण्याची विनंती करण्यात आली व त्याचे चित्रिकरण करण्यात यावे" या सूचनेची नोंद घेण्याची सूचना केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना पुढील कार्यवाहीची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी प्रकल्पाचे सादरीकरण सुरु केले. प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्याः-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश,नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र,प्रकल्पाचे वैशिष्ट्ये,प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधि, शेतकऱ्यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती

- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी विस्तृत सादरीकरण केलेले आहे. आता उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रत्येक ओळीप्रमाणे प्रश्न, आक्षेप नोंदविण्याची सूचना केली. त्यांनी पहिल्या ओळीतील उपस्थितांना सूचना, प्रश्न विचारण्याचे आवाहन केले. पहिल्या ओळीत प्रतिसाद नव्हता. नंतर दुसऱ्या ओळीतील उपस्थितांना प्रश्न विचारण्याची सूचना केली. दुसऱ्या ओळीतून प्रतिसाद नव्हता. त्यावेळी अध्यक्ष यांनी तिस-या ओळीतील उपस्थितांना प्रश्न, सूचना विचारण्याचे आवाहन केले. तिस-या ओळीतील व्यक्तींचा प्रतिसाद नव्हता. म्हणून चौथ्या ओळीतील व्यक्तींना विचारण्याचे आवाहन करण्यात आले. चौथ्या ओळीतून प्रतिसाद नव्हता. त्यावेळी अध्यक्ष यांनी ज्यांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना,विचार, टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदवायचे असल्यास हात वर करण्याचे आवाहन केले. त्यावेळी उपस्थितांना हात वर केल्यानंतर अध्यक्ष यांनी पोडियमजवळ न येता जागेवरुनच बोलण्याची सूचना केली.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-**

१) **श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, राहणार-तेलंगणा:-**

| अ. क्रं. | क्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझ्या प्रकल्प व्यवस्थापनास व स्थानिक ग्रामस्थांना सदरहू प्रकल्पाबाबत शुभेच्छा. मी भारतातील पहिला पर्यावरणवादी आहे की जो प्रकल्पाचे, औद्योगिकीकरणाचे समर्थन करतो. माझ्या मते बेरोजगारी हेच समाजातील प्रदूषण आहे. मी वयाच्या ६७ वर्षाचा असून मला कुठलाही आरोग्याचा त्रास नाही. मी औद्योगिकरणास पाठिंबा देतो कारण की भारतात दरवर्षी सुमारे एक कोटी व्यक्ती त्यांचे शिक्षण पूर्ण करतात. मात्र त्यापैकी फक्त ५-६ लाख लोकांना केंद्र किंवा राज्यात रोजगाराची संधि मिळते. उर्वरित ९५ लाख युवक-युवती हे खाजगी औद्योगिक क्षेत्रावर अवलंबून आहेत. म्हणून मी औद्योगिकरणास | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की बेरोजगारी हे समाजातील सर्वात मोठे प्रदूषण आहे, हे आम्ही मान्य करतो, त्यावर मात करण्यासाठी औद्योगिकीकरण व विविध प्रकल्पांची गरज आहे. |

| | | |
|---|---|---|
| | पाठिंबा देत आहे. मी पर्यावरण संवर्धनासाठी काही सूचना करत आहे-<br>प्रकल्पात Controlled Blasting करण्यात यावे. त्याचप्रमाणे रस्त्यावर पाणी शिंपडण्याची व्यवस्था ही योग्यप्रकारे राबविण्यात यावी. या दोन गोष्टी प्रकल्पात कार्यान्वित केल्यास मायनिंग प्रकल्पातील प्रदूषणचा त्रास होणार नाही. या सर्व उपक्रमात स्थानिकांचा सहभाग करण्यात यावा. त्याचप्रमाणे प्रकल्प परिसरातील युवक-युवतींसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण राबविण्यात यावा. त्यामुळे ज्या स्थानिक युवक-युवतींना येथील प्रकल्पात रोजगार मिळणार नाही, त्यांना दुसरीकडे मिळू शकतो.<br>सदरहू प्रकल्पामुळे शासनास महसूल मिळतो, स्थानिकांना रोजगाराची संधी उपलब्ध होते. मात्र पर्यावरण अनुमती<br>प्राप्त होण्याची प्रक्रिया ही वेळखाऊ असून त्यामुळे सर्वांनाच तोटा होतो. तरी मी केंद्र शासनास विनंती करतो ही सदरहू प्रक्रियेतील विलंब टाळून एक वर्षाच्या आत पर्यावरण अनुमती प्रदान करण्यात यावीत. मी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस विनंती करतो की सदरहू प्रकल्पास मान्यता देण्यात यावी. त्याचप्रमाणे कंपनीस विनंती आहे की प्रकल्पापासून जल, वायू प्रदूषण होऊ नये याची सर्वात जास्त काळजी घेण्यात यावी. | |
| २) | आपल्या पर्यावरण सल्लागार यांनी परिसरातील पर्यावरणाचा सद्यस्थितीचा अभ्यास/सर्वेक्षण केलेले आहे. मात्र, येते परिसरातील सद्याची आरोग्याच्या स्थितीचा अभ्यास करण्यात यावा. त्याचप्रमाणे परिसरातील पीकांची सद्यस्थितीचाही अभ्यास करण्यात यावा. त्याचप्रमाणे प्रकल्प परिसरातील भूगर्भ पातळीचा अभ्यास करण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की आम्ही भूगर्भातील पाण्याच्या पातळीचा अभ्यास करत आहोत. केंद्र सरकारच्या CGWA विभागाचे सर्व निर्देश पाळण्यात येतील- Consolidated Hydro Geology Survey, भोवतालचा पाणीसाठा, प्रकल्पास लागणारे पाणी व भूगर्भजल संवर्धन याचे नियोजन/अभ्यास आहे. प्रकल्पामुळे परिसरातील जलस्त्रोत, नाले (हंगामी व बारमाही) यांवर प्रकल्पाचा कुठलाही दुष्परिणाम होणार नाही. |
| ३) | त्याचप्रमाणे येथील मायनिंग उद्योगात खोदकाम सुरु केल्यानंतर प्रत्येक हेक्टरप्रमाणे हरितपट्टा विकसित करण्यात यावा. इतर उद्योगांप्रमाणे मायनिंगमध्ये 33% हरितपट्टा विकसित करणे शक्य होत नाही. तरी | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की सदरहू सूचनेचे स्वागत. जेथे जेथे शक्य आहे, तेथे औषधी वनस्पती लावण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| | शक्य असल्यास जवळील गावात हरितपट्टा विकसित करण्यात यावा, त्याचप्रमाणे जेथून कंपनीसाठी वाहतुक होणार आहे, त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूस झाडे लावण्यात यावीत. त्यामुळे धुळीचे प्रदूषण नियंत्रणास मदत होईल. हरित पट्टा विकसित करताना औषधी वनस्पती व फळ झाडे मोठ्या प्रमाणात लावण्यात यावीत. | |

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले.

## २) श्री रामदास सदाशिव पखाले, राहणार — पुनवट, तालुका-वणी, जिल्हा-यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी या कंपनीविषयी बोलू इच्छितो. कंपनीने येथे जमिनी घेतल्या आहेत. तरी कंपनी चालू केल्यानंतर जे प्रदूषण होईल, त्याचे नियंत्रण कंपनीने करणे अत्यंत गरजेचे आहे. या वणी परिसरात अनेक कंपन्या कार्यरत असून प्रदूषण नियंत्रणाचा कोणीही विचार केलेला नाही. प्रदूषणामुळे मानवी जीवनावर, वनस्पतीरवर, पशूपक्ष्यांवर परिणाम होतो. वनस्पतीची वाढ ही योग्यप्रकारे होत नाही. तरी या कंपनीकडून प्रदूषण नियंत्रणाच्या सर्व उपाययोजना झाल्या पाहिजेत. तीन गावे या क्षेत्रात येणार असे लिहिलेले आहे. तर प्रदूषण हे फक्त तीन गावातच राहणार नाही, तर ते प्रदूषण २०-२५ कि.मी. लांब जाऊ शकते. तेवढ्या अंतरावरिल लोकांमध्ये प्रदूषणाचा प्रभाव होऊ शकतो. तरी बळीराजा पार्टी वणी विधानसभा मतदार संघातर्फे मी रामदास उखाले बोलतो की या प्रदूषणावर सर्वार्थाने मात केलेली पाहिजे. येथील अगोदरच्या कंपन्यांनी या प्रदूषणाबाबत कोणताच विचार केलेला नाही व येथील जनता प्रदूषणामुळे त्रस्त आहे. हा प्रश्न येथे उपस्थित करत आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की प्रदूषण न होण्यासाठी शासनाने पारित केलेल्या अटी व शर्तीचे तंतोतंत पालन करण्यात येईल. त्याशिवाय असे कुठलेही तंत्रज्ञान असेल, योजना असेल की त्यामुळे प्रदूषण कमी होईल, तर ती प्रकल्पात राबविण्यात येईल. त्यात फक्त बाधित गावांचा विचार न करता संपूर्ण क्षेत्राचा विचार करण्यात येईल. |
| २) | तसेच कंपनीच्या प्रदूषणावर लक्ष ठेवण्यासाठी एक समिती गठित करण्यात येते. त्यात जिल्हाधिकारी, कंपनीचा प्रतिनिधी, खासदार, आमदार एवढेच त्या समितीत सभासद असतात. तरी प्रत्येक गावातील | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की आम्ही जी विकास कामे हाती घेतो, त्या प्रत्येक विकासकामात स्थानिकांचा सहभाग करुन घेतो. तेथील वरिष्ठ नागरिकांचा सल्ला |

| | | |
|---|---|---|
| | एक प्रतिष्ठित व्यक्ती ही समितीत असावी. त्याचप्रमाणे त्या प्रत्येक गावातील राजकीय व्यक्तीसुध्दा समितीत असावी, सर्वानुमते काम झाले पाहिजे. आम्ही जेव्हा कंपनीत भेटण्यास गेलो, त्यावेळी कंपनी प्रशासनाने सांगितले की आमची जिल्हाधिकारी यांच्यासोबत बैठक असून त्या बैठकीत जो निर्णय होईल, तो सांगण्यात येईल. कंपनीकडून कुठलाही सकारात्मक निर्णय होत नाही व तो जनतेपर्यत पोहचत नाही. तरी यावर वरिष्ठ अधिकारी यांनी चांगले लक्ष ठेवावे. तसेच जनतेस जेवढ्या सुविधा देण्यात येतील उदाहरणार्थ – रस्ते, आरोग्यविषयक, शिक्षणाविषयी, शुध्द पाणी पुरवठा याबाबत कंपनीने सहकार्य करावे. | घेण्यात येतो. त्याचप्रमाणे स्थानिक गावकऱ्यांचा सहभाग समितीमध्ये करण्यात येईल. |
| ३) | शिक्षणाबाबतचे, आरोग्याबाबतचे व त्या गावाच्या विकासाच्या बाबत काय करू शकता, याबाबतीतील नियोजन सांगण्यात आलेले नाही. त्याचे स्पष्टीकरण देण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की आमचे प्रकल्प हे विविध भागात कार्यरत आहेत. त्याठिकाणी जी आरोग्यविषयक, शिक्षणाबाबत तसेच गावांचा विकास करण्याबाबत दरवर्षी जी रुपरेखा नियोजित करण्यात येते, ती येथे राबविण्यात येईल. येथे प्रथम Need Base study करण्यात येईल.शाळेची इमारतीस काही सुविधा पुरविणे आवश्यक असेल तर ती पुरविणे, कौशल्यविकास कार्यक्रम राबविणे, त्याप्रमाणे उपक्रम राबविण्यात येईल. हेच धोरण आरोग्य व रोजगारांबाबत राबविण्यात येईल. सीएसआर निधी हा 100% येथील विकासासाठी वापरण्यात येईल. शासनाच्या निर्देशांप्रमाणे ग्रामपंचायत, ग्रामसेवक यांच्याशी चर्चा करुन निधीवाटप हिस्सा ठरविण्याच येईल. |
| ४) | जर आपणाकडे गावाचा विकास करण्यास निधी उपलब्ध नसेल, तर आपण कोणतीच योजना राबविणार नाहित. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की तसे होणार नाही. प्रथम स्थानीक ग्रामपंचायतीशी चर्चा करुन योजना ठरविण्यात येऊन त्यास निधी उपलब्ध करण्यात येतो. तरी आपण याबाबत निशंक राहावे. आम्ही शाश्वती देऊ शकतो, शिवाय या मुद्द्याचा बैठकीच्या इतिवृत्तात समावेश असणार आहे. |

| | | |
|---|---|---|
| 5) | प्रत्येक गावातील पाच-पाच माणसे लोकांकडून निवडून घ्या. घेऊन समिती तयार करण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

## ३) श्री राहुल महेंद्र झट्टे राहणार-चिंचाळा, तालुका-मारेगांव, जिल्हा – यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्प अहवालात रोजगाराबाबत काहिही उल्लेख नाही. या प्रकल्पात डोंगरगाव हे सर्वात जास्त बाधित होणार आहे. येथील साक्षरतेचे प्रमाण हे ७६% आहे. येथील स्थानिक प्रकल्प सुरु झाल्यानंतर बेरोजगार युवक-युवतींना जर प्रकल्पात नोकरीची संधि देणार असाल, तर त्यासाठी आतापासून काही तरतुद करता येईल का? तरी प्रस्तावित प्रकल्पात कशा प्रकारच्या शिक्षणाची गरज लागेल, याबाबत जनजागृती स्थानीक पातळीवर करणे आवश्यक आहे. येथे स्थानिक बेरोजगार युवक युवती ज्या आय.टी.आय, डिझेल मेकॅनिक, वेल्डर अशा संवर्गात शिकलेले आहेत, तर प्रस्तावित प्रकल्पात त्यांना रोजगाराची संधी मिळेल का. याबाबत विचारमंथन होणे आवश्यक आहे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रकल्पात स्थानिकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार व प्रकल्पातील गरजेनुसार रोजगाराची संधि देण्यात येईल. प्रकल्पात रोजंदारीसाठीही स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येईल. या उद्योग समुहाकडून कौशल्य विकास कार्यक्रम वेळोवेळी हाती घेतले जातात. अशा प्रकारच्या प्रकल्पात आवश्यक असणारे कौशल्य विकसित करण्यासाठी प्रशिक्षण देण्यात येईल व प्रशिक्षण पूर्ण करणा-यांना प्रकल्पातील गरजेनुसार प्राधान्य देण्यात येईल. त्या युवक/युवतींना परिसरातील दुसऱ्या प्रकल्पात संधी मिळू शकते. |
| २) | आता प्रदूषणाबाबत म्हणजे येथील वणी, मारेगाव तालुका असतील वा बाजूचा चंद्रपूर जिल्हा, प्रकल्प सुरु होईपर्यंत प्रकल्पाच्या शेजारी व जवळ असणा-या शेतकऱ्यांना मोठी आश्वासने दिली जातात. त्या शेतकऱ्यांना खूपच त्रास होतो. मात्र एकदा प्रकल्प सुरु झाला की त्याला कोणीही विचारत नाही. प्रकल्प पुर्ण झाला की तो निवेदन देऊन देऊन मरण पावतो पण कोणी त्याच्याकडे पाहत नाही. तर ओ.बी.च्या शेजारी जी भिंत बांधतो, तर ती किती दिवस टिकणार व त्या ओ.बी.चा त्रास हा त्या शेतक-याली किती होणार. यावर विचारमंथन होणे आवश्यक आहे. कारण खोदकाम करताना वरिल सुपीक जमिन/ओ.बी. आपण बाहेर काढून ती कुठे टाकणार, ती सीएसआर निधीतंर्गत ती माती लागवडीसाठी वापरता येईल का? याबाबत धोरण ठरविणे आवश्यक आहे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर होणाऱ्या त्रासाबद्दल आक्षेप नोंदविण्यात आला. तर येथे २५२.३६ हेक्टरमध्ये आमचा प्रकल्प होणार आहे. तर उत्खनन जागेत प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ती जागा हरितपट्टा म्हणून किंवा जलस्त्रोत म्हणून विकसित करणे बंधनकारक आहे. प्रत्येक डपिंगचा स्लोप हा राखला जाईल. त्याला संरक्षित भिंत बांधण्यात येईल. जवळील शेतकऱ्याचे नुकसान होणार नाही, याची काळजी घेण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ३) | या प्रकल्प विकसनामुळे जेवढी झाडे कापली जातील, त्याचे आपण कार्बन क्रेडिट केले पाहिजे. कार्बन क्रेडिट हा चांगला मुद्दा आहे. शेतकऱ्यांची ५०-६० वर्षे झालेली झाडे तोडण्यात येणार आहे. ३३-३४% प्राणवायू देणारी झाडे, ५०० किलो वार्षिक प्राणवायू देणारी झाडे तोडण्यात येणार आहे, तर कार्बन क्रेडिटचा लाभ त्या शेतकऱ्यांना मिळणे आवश्यक आहे. हरित पट्टा विकसित करुन ती हानी भरून निघणार नाही. शेतकऱ्यांच्या जमिनीचा जो काही मोबदला द्यायचा तो द्या, पण त्यांना कार्बन क्रेडिटचा मोबदला द्यायलाच पाहिजे. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. हा मुद्दा शासकीय स्तरावरिल असल्याने कंपनी याबाबत आपले मत मांडू शकत नाही. शासन स्तरावरिल निर्णय कंपनी मान्य करेल. |
| ४) | तिसरा मुद्दा –<br>प्रकल्पामुळे जमीनीची धूप होणार आहे, जल,वायू प्रदूषण होणार आहे. भूजलावरसुध्दा परिणाम होणार आहे. ब्लास्टींगमुळे नैसर्गिक साठ्यावर परिणाम होणार आहे. जे नाले पावसाळ्यात जीवंत होतात, त्यांच्यावरसुध्दा या प्रकल्पाचा परिणाम होणार आहे. याबाबत येथे चर्चा होणे आवश्यक आहे. त्या नाल्यावरही काही लोकांचे जीवनमान अवलंबून आहे. ते इंजिन लावून त्यावर पाणी टाकून पोलित करतात. त्यांची जमिन जर प्रकल्पात जाणार असेल, तर त्यांचे पुनर्वसन कसे करणार. ही माहिती प्रकल्प अहवालात जाणे आवश्यक आहे, कारण त्यांचे पुनर्वसन कसे करणार, याबाबत नियोजन करणे आवश्यक आहे. जर ओ.बी. च्या मातीमुळे नाला बंद झाला, तर त्या शेतकऱ्याला शेतासाठी पाणी मिळणार नाही. त्याचे रबीचे उत्पादन हे बंद होईल. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ५) | आजूबाजूच्या गावांवर जो प्रकल्पाचा परिणाम होणार आहे, तर तेथे अशी झाडे लावण्यात यावीत की त्यामुळे धुळीचे प्रदूषणाचा अटकाव होईल. धूळ ही वा-यासोबत खूप लांब जाऊ शकते. तरी शास्त्रीयदृट्या झाडे लावण्यात यावीत | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की प्रकल्पामुळे धुळीचे प्रदूषण होणार आहे. तरी धुळ दाबली जाण्यासाठी पाणी शिंपडण्याबरोबरच झाडे लावण्याचा मुद्दा होता. हा मुद्दा आम्ही १००% मान्य करतो. प्रथम स्थानिक प्रजातीच लावण्यात येतील, त्याचप्रमाणे धूळ दाबण्यासाठी (dust suppression) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांप्रमाणे झाडांच्या प्रजाती लावण्यात येतील. |

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी आता पर्यंत बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्द्यांना त्वरित उत्तर देण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तरे दिल्यानंतर उपस्थितांना सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले.

४) **श्री उद्धव भाऊराव बोडाले, राहणार-बोडी, तालुका-वणी,जिल्हा-यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या प्रकल्पामुळे शेतीतील जी बोअरवेल आहे, ती बंद पडणार नाही यासाठी काय उपाययोजना आहेत का? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की प्रकल्पात अत्याधुनिक असे कंट्रोल डिले ब्लास्टींग ही प्रणाली अंगिकारण्यात येईल. त्यात टाकावे लागणारे स्फोटक पदार्थ हे सिरीजमध्ये टाकतो. आधुनिक प्रणालीचे व्हिडिओ हे दूरदर्शन/सिनेमात दाखविलेले आहेत. मोठी इमारत स्फोटामुळे काही मिनिटात पडते, पण बाजूच्या भिंतीलाही जराही त्रास होत नाही. त्या स्फोटाच्या कंपनांमुळे परिसरातील बोअरचे पाणी जाण्याची शक्यता असते. त्याचा अभ्यास करण्यात येईल. त्याप्रमाणेच आम्ही स्फोट घडवून आणतो. स्फोटाची कंपने ही लांब अंतरावर जातील, याचाही अभ्यास करण्यात येईल. त्यानंतरच तो लांब अंतराचा प्रभाव कमी करुनच स्फोट घडविण्यात येईल. त्यामुळे परिसरातील रस्ता खचण्याचा संभव नगण्य आहे. यातही अजूनही काही आधुनिक प्रणाली आली तर ती निश्चितच अंगिकारण्यात येईल. त्याचप्रमाणे भूगर्भ जलाचा संवर्धन करण्यात येईल. त्यासाठी पीट्स तयार करण्यात येतील. भूगर्भ जलाची आमची गरज ही खूपच कमी आहे, १५ किलो कॅलरी आहे. बाकीचे पाणी जमिनीवर शिंपडण्यासाठी, हरितपट्टा विकसनासाठी वापरण्यात येईल. प्रकल्प क्षेत्राच्या बाहेर भूजलाची पातळी कमी होणे, बोअर बंद होणे याची शक्यता नगण्य आहे. |
| २) | प्रकल्प सुरु झाल्यानंतर प्रकल्पातील उत्पादनामुळे जी वाहतुक, रहदारी वाढणार आहे, त्यासाठी सर्वात प्रथम रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी, कारण परिसरात बरेच रस्ते अरुंद आहेत. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की मताशी सहमत असून सदरहू रस्त्याचे रुंदीकरण, दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. ग्रामवासियांच्या वाहतुकीत कोणताही त्रास होणार नाही असा आमचा प्रयत्न राहिल. त्यासाठी रस्ता दुरुस्ती करण्यात येईल व जरुर असल्यास रुंदीकरण करण्यात येईल. रस्ता बळकटीकरण करावयाचे असल्यास ते करण्यात येईल. |

५) **सौ. हेमा देशपांडे, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | भूगर्भातील पाण्याचे रिचार्ज (संवर्धन) बाबात येथे माहिती देण्यात यावी. | प्रकल्पातील पीट्सची खोली व भूगर्भातील पाणी Zone of influence हा पीट्सच्या व साठलेल्या पाण्याप्रमाणे calculation केले, तर ते जवळपास शंभर मीटर आहे. आमचे क्षेत्र हे २५२ हेक्टर आहे. म्हणून एमएल हद्दीच्या बाहेरच्या भागात परिणाम होण्याची शकत्या अगदी नगण्य स्वरूपात आहे. मात्र जरीही एखाद्याचे नुकसान झाले, तर शासकीय पध्दतीने त्याचे निवारण करण्यात येईल. |

६) **श्री दिलीप रामदासजी भोयर, राहणार-वणी, तालुका-वणी, जिल्हा-यवतमाळः-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | अनेक कंपन्या या क्षेत्रात चालू आहेत. प्रत्येक कंपनी सुरु होताना सांगत असते की स्थानिकांना प्राधान्य देण्यात येईल. मात्र सद्यस्थिती सर्व प्रकल्पात पाहिले तर ५०% हून कामगार हे बाहेर गावचे/बाहेर राज्यातील आहेत. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की महाराष्ट्र शासनाच्या नियमाप्रमाणे ८०% रोजगार हा स्थानिकांनाच देण्यात येईल. |
| २) | दुसरा मुद्दा कंत्राटी पध्दतीमध्ये स्थानिकांना प्राधान्य. वणी परिसरातील कोणत्याही कंत्राटी संस्थेला येथील कंपन्यांनी काम दिलेले नाही. शासनाने कंपन्यांचे रेकॉर्ड तपासावे | कंत्राटी कामगार भरताना स्थानीक लोकांकडे शैक्षणिक अहर्ता असेल व त्यांची कंपनीत आवश्यकता असल्यास त्यांना प्राधान्य देण्यात येईल |
| ३) | तिसरा मुद्दा कौशल्य विकास शिबिरे राबवू. तर कंपनीने त्याबाबत माहिती पुरविण्यात यावी की किती शिबिरे राबवली. | कौशल्यविकास प्रशिक्षण शिबिर किती – तर आम्ही ३०-३० च्या दोन बॅच केलेल्या असून आता तांत्रिक कौशल्यविकास प्रशिक्षण आयोजित करण्याचा मानस आहे. एसएजी फॉर्मेशनमध्ये ११२ महिला या जोडलेल्या आहेत. ज्या व्यक्तीकडे शैक्षणिक अहर्ता कमी आहे, पण त्यांना तांत्रिक कौशल्यविकास करण्याची इच्छा आहे, त्यासाठी त्यांना Need Base Study राबविण्यात येईल. त्यांची गरज कशी आहे, त्यानुसार आमचे सीएसआर निधी अंदाजपत्रक |

| | | |
|---|---|---|
| | | असेल. यात १००% सहभाग हा फक्त गावकऱ्यांचा असेल. |
| ४) | २५-३० टन वाहतुक करणारे डंपर दररोज ३,०००.० टन मालवाहतुक करणार आहात. येथील रस्ते हे सार्वजनिक बांधकाम खात्याचे, जिल्हा परिषदेचे आहेत. तर या परिसरातील रस्ते एवढी वाहतुक करण्यास योग्य आहेत का? हा महत्वाचा मुद्दा आहे. जर रस्ते वाहतुक करण्यास योग्य नसतील, तर कंपनीच्या वाहतुकीमुळे आमचे सर्व रस्ते हे उध्वस्त होतील. आणि उध्वस्त झालेले रस्ते परत दुरुस्त करण्याचा शासनास भुर्दंड पडेल. पण खड्ड्यांमुळे अपघात होऊन स्थानीक निरपराध लोक मरतात. वणी भागात अनेक लोक या कंपन्यांच्या डंपरने चिरडले गेले आहेत. हे केवळ येथील अनेक कंपन्यांच्या डंपर, ट्रक्समुळे झालेले आहेत | त्यांचे असे म्हणणे आहे की येथील रस्ता हा तेवढ्या क्षमतेचा नाही. तर आम्ही १००% हमी देतो की त्या रस्त्याची दुरूस्ती, सबलीकरण (strength) जरूरी असल्यास रूंदीकरण करण्यात येईल. नंतरच आमची वाहतूक चालू करण्यात येईल. |
| ५) | माझा प्रकल्पास विरोध नाही. प्रकल्प आल्याशिवाय या भागाचा विकास होणार नाही. मात्र प्रकल्प ज्या उद्देशाने सुरू करण्यात येतो, तो उद्देश बाजूला राहतो. झाडे लावू सांगतात, तेथे फक्त काटेरी बाभळी लावतात. तरी झाडे/हरितपट्टा विकास हा शास्त्रीय पध्दतीने होणे आवश्यक आहे. श्वास हा फक्त गरीबच घेत नाही, तर सर्व मानवजात, सर्व प्राणी घेत असतात. त्यासाठी सर्वांना स्वच्छ हवी आहे. खाणीमुळे पर्यावरणाचा -हास होत असेल, जर खाणीची धूळ श्वासावाटे पोटात जात असेल, तर तूमच्यामुळे आम्ही आजारी का पडू? | येथे लेखी निवेदनात सांगीतले की बाभळाची झाडे लावण्यात येऊ नये. तर आम्ही कधी बाभळाची झाडे लावत नाही. वृक्षारोपण कार्यक्रमात आम्ही झाडे मोजून देतो. आम्ही वृक्षारोपण कार्यक्रमात वीस हजार झाडे लावली. तर त्यात बाभळी १००% नसेल. आम्ही स्थानीक प्रजाती झाडे जी वन विभागाने मंजूर केलेली आहेत, तीच लावण्यात येणार आहेत |
| ६) | शेतकऱ्यांची शेती घेता, त्यांचा हा पारंपारिक उद्योग आहे. तो नष्ट होतो व आपण एका पिढीलाच रोजगाराची संधि देण्यात येते. त्यानंतर त्याच्या पिढीचा विचार शासन करत नाही. खाजगीकरणाव्दारे रोजगार नष्ट होत आहेत, तर दुसरीकडे पारंपारिक शेतीचा उद्योग काढून घेण्यात येत आहेत. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| ७) | येथील अनेक कंपन्यांच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी झाल्या. पण त्यांनी त्यावेळी जे आश्वासने दिलेली होती, त्याची पूर्तता किती झालेली आहे? कोणत्या कंपनीने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता केली याबाबत श्वेत पत्रिका प्रसिध्द करणे आवश्यक आहे | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ८) | कृषि विभागाचा येथील शेतीबाबत अहवाल आहे की कंपन्यांच्या ट्रक्समुळे उडणाऱ्या धुळीमुळे शेतातील उत्पादन हे ५०% पेक्षा कमी झालेले आहे. | त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सूचना, आक्षेप हे मुद्देसूद मांडण्यास सांगितले. त्यांनी दहा मिनीटात सर्व मुद्दे मांडण्याची सूचना केली. |
| ९) | येथील रस्ते कंपन्यांमुळे खराब झाले व आम्हा स्थानिकांना जो त्रास होतो, त्यासाठी आम्ही राष्ट्रीय हरित लवाद, पुणे येथे याचिका दाखल केलेली होती. शंभर कोटींची दंड कंपन्यांना झालेला आहे. त्याविरुध्द काही कंपन्या या आता सुप्रीम कोर्टात गेलेल्या आहेत. म्हणजे येथे फक्त आश्वास द्यायचे, पण ते पुर्ण न करता सुप्रीम कोर्टात जायचे, असा प्रकार येथे होऊ नये. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| १०) | कंपनीचा मालक घर बांधून राहत नाही. येथे आम्हां स्थानिकांना, येथील शेतकऱ्यांना राहावे लागते. येथे स्थानीक शेतकऱ्यांनी आक्षेप नोंदवीला की येथील बोअर वेल्स या आटल्या जातात. येथील खाणींमुळे शेतकऱ्याच्या बोअरवेल्स या आटल्या गेलेल्या आहेत. तरी कंपनीने त्यांच्या खर्चाने शेतकऱ्यांच्या शेतात पाणी जाण्याची सोय करावी. कंपनीने शासनास लेखी हमीपत्र कोर्टाच्या स्टॅम्पने द्यावे की कंपनीमुळे शेतकऱ्याचे नुकसान झाल्यास ते तीस दिवसाच्या आत त्यास नुकसान भरपाई देण्यात येईल. शासनाने असे हमीपत्र कंपनीकडून घ्यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, शेतकऱ्यांचे नुकसान तीस दिवसात द्यावे. तर त्यास उत्तर की ते जर सिध्द झाले, तर तीस दिवसात नुकसानभरपाई देण्यात येईल. |
| ११) | स्थानीक सार्वजनिक रस्त्याचा वापर कंपनी त्यांच्यासाठी करणार आहे. तर रस्ते दुरूस्त करण्याऐवजी रस्ते कंपनीच्या वाहतूकीसाठी नवीन करण्यात यावेत ३० टनाएवढे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | त्यानंतरच कंपनीने वाहतुक करावी. अन्यथा आम्ही तुमची वाहतुक होऊन देणार नाही. | |
| १२) | एकावेळेस दोन एकरा मागे नोकरी दिली जाते. आपण जेव्हा २५० हेक्टर जमिन घेत आहात, तर किमान ५०० लोकांना नोकरी देण्यात यावी. ९१-९२ लोकांना रोजगार म्हणजे खूपच कमी आहे. किमान शासकीय धोरणांनुसार नोकरी देण्यात यावी. दोन एकराप्रमाणे एक नोकरी ही नियम करण्यात यावा, कारण बाकीच्या मुलांनी काय करावे? | प्रकल्पात स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येईल. प्रकल्पात जेवढी गरज आहे, तेवढ्याच व्यक्ती भरल्या जातील. कारण प्रकल्प प्रशासनाने जेवढ्या जागा मंजूर केल्या, तेवढ्याच भरण्यात येतील.त्यावेळी शैक्षणिक पात्रता असलेली व्यक्ती जर स्थानिक असली, तर तिलाच प्राधान्य देण्यात येईल. |

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांची स्वाक्षरी घेण्याची जबाबदारी एका कर्मचाऱ्याने घ्यावी अशी सूचना केली.

**७) श्री सुमेर खान, राहणार-राहणार-राजुरा, तालूका-वणी, जिल्हा- यवतमाळ-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | मायनिंग रोज कार्यान्वीत होणार आहे. तर त्यामुळे जे जल, हवा, ध्वनी हे नियंत्रण कसे करण्यात येईल? त्यासाठी काय उपाययोजना राबविण्यात येतील? | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सादरीकरणात याबाबत विस्तृत माहिती देण्यात आलेली आहे. मायनिंग उपक्रमात ब्लास्टींग व वाहतुक यामुळे फ्यूजिटीव्ह ईमीशन्स होते. ते नियंत्रणात आणण्यासाठी आम्ही प्रकल्पात अत्याधुनीक प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. Control Blasting मुळे कमीतकमी धुळीकण उडतील याची आम्ही हमी देतो. ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी प्रकल्पातील यंत्रांना Acoustic Enclosure कार्यान्वित करण्यात येईल, त्याचप्रमाणे वृक्ष लागवड करण्यात येईल. प्रकल्पासाठी पर्यावरण व्यवस्थापन योजना तयार करुन तो राबविण्यात येईल. या प्रकल्पापासून प्रदूषणाचा दुष्परिणाम होणार नाही याची हमी. |

८) **श्री राजेन्द्र ठाकरे, राहणार -मुधोर्नि, तालुका—वणी, जिल्हा—यवतमाळ-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | धरण असो, रस्ता असो वा खाण असो, शेतकऱ्याची पारंपारिक शेत जमिन अधिगृहित झाल्यावर त्याला मोबदला मिळतो. पिढ्यानपिढ्या त्याचा रोजगार हिरावला जातो. त्याला काही वेळेस शासकीय नोकरीत सामाऊन घेण्यात येते. तो लोकांना अन्न मिळवून देतो, त्याचा पिढ्यानपिढ्याचा व्यवसाय हिरावून घेतला जातो. विकासाच्या नावाखाली बैलबंडी विकायची, आणि बाईक घेऊन फक्त फिरायचे. तर त्यात अशीही शेतकरी असतील की त्यांना शेती प्रकल्पासाठी द्यायचीच नसेल, तर त्याबाबत शासनाचे धोरण काय? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले आमच्या कंपनीने ज्यांची जमिन घेतली जाते,त्यास पैसे चांगले मिळतात. त्यावेळी एक आर्थीक सल्लागार असेल,तो त्यांना कशी बचत, कशी गुंतवणूक करायची याबाबत सल्ला देतील. शेतकऱ्यांना त्याचा सल्ला पटल्यास, त्यांनी गुंतवणूक करावी. शेतक-यांवर ते बंधनकारक नाही. हा सल्ला आम्ही देऊ. त्याची जरुर आहे. |

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना परत सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता. समन्वयक यांनी मत मांडले की सर्वांचे बोलणे झालेले दिसते.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनीही उपस्थितांना त्यांच्या काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले, त्यासाठी हात वर करण्यात यावा. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

ऑनलाईन कोणी आहे याबाबत संपर्क साधण्यात आला. ऑनलाईनसुध्दा कोणीही नव्हते.

पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी म.प्र.नि. मंडळास ज्या लेखी सूचना, आक्षेप प्राप्त झाले ते बैठकीत वाचण्याची व त्यास प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्त्तर देण्याची सूचना केली.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की येथे चार निवेदन प्राप्त झालेली आहेत. समन्वयक यांनी सांगितले की ते प्रथम वाचून दाखवतील व त्यास प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर देण्यात यावे —

**निवेदन — १**

**सेव्ह अर्थ मेट्रो अर्बन एन्ड रुरल डेव्हलपमेंट सोसायटी —**

**द्वारा — रंगाराव कोथा कोंडा —**

**त्यांनी दिलेल्या सूचना समन्वयक यांनी वाचल्या नंतर प्रकल्प प्रवर्तकास त्याचे उत्तर देण्याची सूचना केली.**

**(अ)** तुमच्या सल्लागाराने आधीच बेसलाइन सर्वेक्षण केले आहे किंवा हवा, पाणी, जमीन हे खूप चांगले आहे. माझी विनंती आहे की कृपया लोकांच्या आरोग्याची स्थिती आणि पीक उत्पादनाची स्थिती आणि भूजल उपलब्धतेचा डेटा गोळा करण्यात यावा.

**उत्तर-**

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की या मुद्द्यांवर पूर्वीच उत्तर देण्यात आलेले आहे.

आम्ही भूगर्भातील पाण्याच्या पातळीचा अभ्यास करत आहोत. केंद्र सरकारच्या CGWA विभागाचे सर्व निर्देश पाळण्यात येतील- Consolidated Hydro Geology Survey, भोवतालचा पाणीसाठा, प्रकल्पास लागणारे पाणी व भूगर्भजल संवर्धन याचे नियोजन/अभ्यास आहे. प्रकल्पामुळे परिसरातील जलस्त्रोत, नाले (हंगामी व बारमाही) यांवर प्रकल्पाचा कुठलाही दुष्परिणाम होणार नाही.

आम्ही परिसरातील आरोग्याच्या सद्यस्थितीबाबत अभ्यास करायला पाहिजे याबाबत सहमत आहोत. परिसरातील आरोग्यस्थितीबाबत वेळोवेळी आरोग्य शिबिरे घेत आयोजित करण्यात येतात. नुकताच आम्ही मुकुटबन व आजूबाजूच्या परिसरात एक आरोग्यविषयक कार्यक्रम हाती घेतलेला होता. त्याप्रमाणे आम्ही काम करतो.

(आ) कृपया वॉटर हार्वेस्टिंग स्ट्रक्चर तयार करा आणि पाणी साठवा. हे उद्योगासाठी वापरण्यासाठी आणि क्षेत्रातील भूजल पातळी विकसित करण्यासाठी उपयुक्त आहे.

**उत्तर:-**

पावसाचे पाणी संवर्धनासाठी सर्व उपाय अंगिकारण्यात येतील. त्यासाठी लागणारी सर्व रचना (structure) उभारण्यात येईल. त्याचप्रमाणे पाणी साठवण व्यवस्था (water storage tank) विकसित करण्यात येईल. रेन वॉटर हार्व्हेस्टींग व रिचार्ज व्यवस्था पुरविण्यात येईल.

(इ) जवळपासच्या गावांमध्ये ग्राम वृक्षारोपण आणि अंतर्गत रस्त्यांसाठी मार्गावर वृक्षारोपण. फळ देणारी झाडे आणि औषधी मूल्ये असलेल्या वनस्पतींना तुम्ही प्राधान्य द्यावे.

**उत्तर -**

या प्रश्नाचे उत्तर अगोदरच देण्यात आलेले आहे. स्थानीक प्रजातीच्या वनस्पती लावण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे औषधी वनस्पतींची लागवड वृक्षारोपण कार्यक्रमात करण्याचा निश्चितच विचार करण्यात येईल.

(ई) कृपया स्थानिक सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगार देण्यासाठी सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे.

**उत्तर:-**

स्थानिकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार व प्रकल्पातील गरजांनुसार रोजगारात प्राधान्य देण्यात येईल.

(उ) बेरोजगार तरुणांना उत्तम कौशल्याचे प्रशिक्षण दिल्यास त्यांना उद्योगात चांगली संधी मिळण्यास उपयुक्त ठरेल, उर्वरित तरुणांना इतर उद्योगांमध्ये नोकरी मिळेल.

<u>उत्तर-</u>

कौशल्यविकास कार्यक्रम राबविण्यात येईल. स्थानिक युवक-युवतींची या प्रकल्पाशिवाय दुसऱ्या प्रकल्पात नोकरी मिळण्यासाठी सक्षम करणारे कौशल्यविकास कार्यक्रम हाती घेण्यात येतील.

**(ऊ) गावांना गावसमीती -**

गावातील प्रतिष्ठित व्यक्तींना सोबत एक समिती स्थापन करण्यात येईल. गावातील गरजांचा विचार करुन त्याबाबत निश्चितच प्रकल्पाकडून त्या योजनांना मदत करण्यात येईल.

(ए) जनजागृती कार्यक्रमाला चालना देण्यासाठी; दुर्बल घटकांसाठी ग्रामीण प्राथमिक शिक्षण;

<u>उत्तर-</u>

प्रकल्पग्रस्त गावात काही शैक्षणिक, आरोग्य पायाभूत सुविधा विकसित करणे आवश्यक असल्यास त्या निश्चितच पुरविण्यात येतील. शिक्षणाची जास्त आवश्यकता असल्यास त्यादृष्टीन शैक्षणिक कार्यक्रम हाती घेण्यात येईल.

<u>लेखी निवेदन क्रं. २ -</u>

## <u>GREAT INNOVATION NATURAL & ENVIRONMENT SOCIETY</u>

अ) उद्योगाने तरुणांना, स्थानिक लोकांना त्यांच्या आवश्यक पात्रतेनुसार रोजगार देण्यात यावा, तसेच उद्योगाने स्थानिक लोकांसाठी स्वयंरोजगार योजना तयार करण्यात यावी.

<u>उत्तर-</u>

जे self-help group असतात, त्यांना निश्चित सक्षम करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. त्यांना रोजगार असून दे किंवा व्यवसाय, त्यांना सक्षम करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

आ)सिमेंट रस्ता, ड्रेनेज इतर पायाभूत संरचना विकास समस्या

<u>उत्तर-</u>

परिसरातील पायाभूत सुविधा पुरविण्यात निश्चितपणे कंपनीचा सहभाग असेल.

इ) स्टडी सर्कल मिळवा, स्थानिक तरुणांना उत्तम रोजगार आणि नागरी सेवा सुरक्षित करण्यासाठी सुसज्ज ग्रंथालय आणि प्रशिक्षण द्या.

**उत्तर -**

आम्ही कोचींग क्लासेस व त्यास आवश्यक असणारी प्रशिक्षित शिक्षक पुरविलेले असून त्यातून आजच्या घडीला २-३ जण नागरी परिक्षा उत्तीर्ण होऊन शासनाच्या सेवेत रुजू झालेले आहेत. जर येथे विद्यार्थी उच्छूक असतील, तर १००% त्यासाठी वाचनालय, कोचिंग क्लास बाबत निश्चितच विचार करण्यात येईल.

ई) २५% नफा कंपनीने स्थानिक लोकांच्या किंवा कर्मचाऱ्यांच्या विकासासाठी वापरला पाहिजे

**उत्तर -**

प्रकल्पास सीएसआर व सीईआर निधी बरोबरच जर गावक-यांची एखाद्या विकास कामाची निकड असेल, तर त्यासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करण्यात येईल.

उ) कृपया हवा, पाणी आणि माती प्रदूषण दूर करण्याबाबत थोडक्यात माहिती द्यावी.

**उत्तर -**

प्रकल्पासाठी पर्यावरण व्यवस्थापन योजना (Environment Management Plan) तयार असून प्रदूषण नियंत्रासाठी सर्वात जास्त अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्यामुळे कुठलाही विपरीत परिणाम आजूबाजूच्या परिसरावर होणार नाही,

ऊ) सर्व सजीवांच्या अस्तित्वासाठी पर्यावरण राखले जाईल याची खात्री करणे. उद्योगाने कामाच्या ठिकाणी लैंगिक समानता पूर्ण केली पाहिजे आणि कामगारांना वेतन दिले पाहिजे आणि वृक्षारोपण केले पाहिजे आणि भरपूर झाडे लावली पाहिजेत.

**उत्तर –**

जेंडर इक्वॅलिटी आम्हीपण मानतो. मग ते वेतन, काम व मोबदला असू द्या, आम्ही जेंडर इक्वॅलिटी (gender equality) पाळतो. त्यात भेदभाव नाही. पण खाणीच्या क्षेत्रात सपोर्ट स्टाफमध्ये उपलब्ध असल्या तरच आम्ही महिला कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात येते.

ए) Mass country plantation and daily growth – लक्ष द्यावे.

लक्ष देण्यात येईल.

ऐ) Pollution to environment should be secured.

येथे अध्यक्ष यांनी उपस्थितांना आवाहन केले की पुढचे निवेदन वाचण्यापूर्वी कोणास काही सूचना, विचार मांडावयाचे असल्यास ते मांडण्यात यावेत. नव्याने कोणी ग्रामस्थ आले असतील, तर त्यांना दोन निवदने झाली की संधी देण्यात येईल.

१) **<u>श्री उस्मान फारुख बुरानी, राहणार-चिखनगाव, तालुका-वणी, जिल्हा – यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आप लोग माईन्समें ब्लास्टींग करते हो, ब्लास्टींगके लिये ड्रिलिंग करते हो, तो ड्रिलिंग फ्युएल क्या होता है. | प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की नॉन-इलेक्ट्रीक डीटोनरसचा वापर करण्यात येईल. फ्युएल लागेल. |
| २) | ही सूचना आहे, आपण फ्युएल वापरणार, म्हणजे कार्बन उत्सर्जन करणार आहात. एवढ्या मोठ्या क्षेत्रात ब्लास्टिंग करणार आहात, तर आपण फ्युएल वापरणे हे किती वर्षांनी बंद करणार आहात. माझी सूचना आहे की ड्रिलींगसाठी फ्युएल वापरण्याऐवजी अत्याधुनिक वीजेची उपकरणे वापरावीत. तसेच ती उर्जा (Electricity) कार्बन क्रेडिट/फूट प्रिंटशिवाय स्वतः सोलर उर्जा निर्मिती करण्यात यावी. म्हणजे कार्बन इमीशन फूट प्रिंटला कमी करता येईल. म्हणजे आपणास सौर उर्जा प्रकल्प उभारावा लागेल. त्या सौर उर्जेच्या सहायाने आपण ड्रिलिंग करावे. आपण एवढा मोठा प्रकल्प राबविणार आहात, तर आपण ही लहान गोष्ट केली, तर आपले कार्बन फूट प्रिंट वाचू शकते. | प्रकल्प प्रवर्तक यांनी याबाबत निश्चितच सकारात्मक निर्णय घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल. प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की इलेक्ट्रीक ब्लास्टींगच मशीन तयार झालेली नाही. मात्र ती उपलब्ध झाल्यानंतर आम्ही तीचा त्वरित वापर करू. |

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना परत आवाहन केले की ज्यांना सूचना, आक्षेप नोंदवायचे असतील, त्यांनी ते उपस्थित करावेत.

**<u>पुढील लेखी निवेदन समन्वयक यांनी वाचले –</u>**

**<u>लेखी निवेदन क्रमांक – ३ -</u>**

**<u>SAVE EARTH METRO, URBAN & RURAL DEVELOPMENT SOCIETY- N. K. Ashok, President –</u>**

अ) सरकारी नियमांनुसार पर्यावरणाला होणारे प्रदूषण रोखण्यासाठी पावले -.

**उत्तर -**

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी पारीत केलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन करण्यात येईल.

ब)बेरोजगार तरुणांसाठी कार्यक्रम आणि पात्र उमेदवारांना रोजगार उपलब्ध करून देणे

**उत्तर –**

सदरहू सूचनेची नोंद घेण्यात आलेली असून त्यानुसार स्थानिक गरजा लक्षात घेऊन कौशल्य प्रशिक्षण योजना राबविण्यात येतील. उदा – सातवी ते नववीच्या वर्गातील मुलांसाठी, तसेच येथील मुलांच्या गरजा ओळखून पदविका अभ्यासक्रम सुरु करणे,

क) बाधित गावांचा विकास ग्राम समितीकडे गेला पाहिजे
सामाजिक कामे ही ग्रामसभेने मंजूर केलेल्या कामांनाच निधी उपलब्ध करुन देण्यात येतील.

ड) कंपनीच्या सभोवतालचा हरितपट्टा, फळे देणारी झाडे आणि औषधी मूल्यांची झाडे.

**उत्तरः-**

सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. समन्वयक यांनी medicinal values plants कुठली लावणार याची माहिती देण्याची सूचना केली. प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की एलोव्हेरा लावण्यात आलेले आहे.

इ)सभोतालच्या गावांना मदत करणे -

**उत्तरः-**

त्या त्या गावातील गरजांनुसार मदत करण्यात येईल. उदा- येथे मोतीबिंदुचे प्रमाण जास्त आहे. त्यानुसार त्याबाबत काळजी घेण्याची सूचना, शस्त्रक्रिया इ.यासाठी व मेडीकल चेक अपसाठी वेळोवेळी शिबिरे आयोजित करण्यात येतील.

आमची मोबाईल मेडिकल व्हॅन ही दररोज गावात जात असते.

ई) समन्वयक यांनी सांगितले की बैठकीत स्थानीक रोजगार संधिबाबत बरीच मागणी करण्यात आलेली आहे, त्याबाबत स्पष्टीकरण –

**उत्तर-**

प्रकल्पात शैक्षणिक पात्रता व कंपनीतील गरजांनुसार रोजगारात प्राधान्य देण्यात येईल.

१०) **श्री मंगेश पाचभाई, राहणार-अडेगांव, तालुका झरी,जिल्हा-यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जमिनीच्या रेटबद्दल काहीही बोलला नाहीत. मोबदला कशा प्रकारे जमिन घेताना देण्यात येईल. एक हप्त्यात देणार की टप्याटप्याने देणार? जमीन एकमुखी अधिगृहित करणार का टप्याटप्याने घेणार? त्याबाबत स्पष्टीकरण. त्याचप्रमाणे प्रकल्पासाठी जी वाहतुक करणार आहात, त्यासाठी स्वतःचा रस्ता तयार करणार आहात वा सार्वजनिक रस्त्यातून वाहतुक करणार आहात? वाहतूकीची क्षमता किती असेल? | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की जमिनीचा जो मालक असेल, त्याच्याबरोबरच वाटाघाटी करुन जमिन खरेदी करण्यात येईल. दुसऱ्या कुठल्याही मार्गाव्दारे जमीन खरेदी करण्यात येणार नाही. जमिन खरेदी करण्यासाठी आम्हांला जी जरुरी आहे, आता ७०-८० हेक्टर जमिन लागते. जमिन खरेदी ही प्रक्रिया आहे. ती जमिन खरेदी करणे कधिही थांबविली जाणार नाही. मूळ मालकाबरोबरच बोलणी करण्यात येईल. |
| २) | असे व्हायला नको की आजूबाजूच्या शेतकऱ्यांचे नुकसान होईल. | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की तसे व्हायला नको. आम्हांला जेवढी लागते, त्याच्या शेजारीच घ्यावी लागते. आता वाहतुकीबाबत स्पष्टीकरण. आमची जी जड वाहने जातील, त्या सार्वजनिक रस्त्याचे सबलीकरण करण्यात येईल व गरज लागल्यास त्याचे रूंदीकरणसुध्दा करण्यात येईल. त्यानंतरच वाहतुक चालू करण्यात येईल. सबलीकरण यासाठी करण्यात येईल की आमच्या ट्रक्स, डंपरच्या क्षमता रस्त्याने सहन करावी. |

समन्वयक यांनी उपस्थितांना काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याची विनंती केली.

११) **श्री सतीश विनायक राजूरकर,राहणार-बोडी, तालुका-वणी, जिल्हा-यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | यातून किती स्थानीकांना रोजगाराची संधी मिळेल. जसे मूकुटबनला आता होत आहे. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या, त्या शेतकऱ्यांच्या मुलांना आठ,नऊ, | यात प्रकल्पात सुमारे ९२ रोजगार उपलब्ध होतील. त्यात कुशल, अर्धकुशल व अकुशल या संवर्गातील रोजगार उपलब्ध असतील. |

| | | |
|---|---|---|
| | दहा हजार रुपयांच्या वेतनावर रोजगार दिला जातो. याबाबत स्पष्टीकरण. | त्यांनी सांगितले की प्रकल्पात शैक्षणिक पात्रता व कंपनीत उपलब्ध असलेली पदे यानुसार स्थानीकांनाच प्राधान्य देण्यात येईल. ही हमी प्रकल्प व्यवस्थापनाकडून देण्यात येते. प्रकल्पात प्रत्यक्ष ९२ रोजगार उपलब्ध होतील. त्या व्यतिरिक्त परिसरात अप्रत्यक्ष रोजगारात प्रचंड प्रमाणात वाढ होईल. उदा. – वाहतुकसाठी लागणारी वाहने, दुचाकी दुरुस्ती वर्कशॉप, चहाची टपरी, पानाची टपरी इ. कंपनीच्या कामांची कंत्राटे जर स्थानीक सक्षम असेल तर त्यास देण्यात येतील |
| २) | प्रश्नकर्त्याने विचारले की जसे मुकूटबनला काही कंत्राटी पध्दतीने घेतले आहेत. | कंपनी अधिकारी यांनी सांगितले की प्रकल्पात स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येईल. तसेच तो कामगार कंत्राटी तत्वावर असला, तरी त्याची नोकरी जाणार नाही याची काळजी प्रकल्प प्रशासन हे घेईल. पण ते पद हे कंत्राटी वा वेतनपटावरिल कायमची असावी, हा कारखाना प्रशासनाच निर्णय असतो. त्यामुळे त्या संबंधित कामगाराची नोकरी जाणार नाही. |
| ३) | मग कंपनी त्या शेतकऱ्यांच्या मुलांना काय हमीपत्र देणार? कारण कंपनीत नफा-तोटा होणारच. | कंपनी अधिका-यांनी सांगितले की खाजगी कंपनीत कोणासही त्याच्या नोकरीची हमी देता येत नाही. त्यामुळे हमीपत्र देता येत नाही. |
| ४) | आक्षेप नोंदविला की त्यांना काढून बाहेरच्या लोकांना घ्यायचा प्रयत्न केला जातो. | जर एखादी व्यक्ती चांगले काम करत असेल, तर त्यास कंपनी कशाला काढेल? |
| ५) | तसेच मुकुटबनच्या आजूबाजूला जी गावे आहेत, त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात येते. त्यांना निधी मिळत नाही. तरी आम्हांला आश्वासन हवे की येथील सीएसआर येथेच वापरण्यात येईल, कारण आम्हांला दूजाभाव दिसलेला आहे. | उत्तर पूर्वी दिलेले आहे. सर्व प्रकल्पबाधीत गावात आम्ही Need Base Analysis चालू करणार आहोत. ज्याची जरुर आहे, त्याचा आराखडा काढण्यात येईल. |
| ६) | आरोग्याची हानी होते. येथील लोकांना खाजेचा आजार होतो. आर.ओ. प्रकल्प नसल्याने गावात किडनी फेलचे प्रमाण खूपच वाढलेले आहे. परिसरातील गावांचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की तेथील लोकांना खाजेचा आजार बऱ्याच प्रमाणात दिसून येतो. तरी याबाबत ज्या उपाययोजना करणार आहात, त्याचे स्पष्टीकरण. | कंपनीतर्फे आर.ओ. प्रकल्प गावात सुरु करण्यात येईल. |

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. जे ग्रामस्थ नव्याने आले आहेत त्यांना त्यांचे काही मागणे आहे काय याबाबत विचारणा केली. जर कोणास लेखी निवेदन द्यायचे असल्यास ते सादर करु शकतात. ते निवेदन बैठकीत वाचून दाखविण्यात येईल व त्यास प्रकल्प प्रवर्तक उत्तर देईल.

<u>निवेदन क्रमांक:- ४ -</u>

<u>**श्री. विजय पिदुरकर, माजी सदस्य – जिल्हा परिषद, यवतमाळ:-**</u>

<u>**मुद्दा क्रं. ४ -**</u>

२५२.३६ लिज असताना आपण ८२ हेक्टर जमिन अधिग्रहण करणार. मग उर्वरित जमिनीबाबत खुलास नाही.

<u>**उत्तर -**</u> प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आम्हांला हे भूखंड महाराष्ट्र शासनाच्या ई-लिलावात प्राप्त झालेले आहेत. आजच्या तारखेला विस्तार ७०-८० हेक्टर पर्यंतच जेथे मिनरल्स आहेत, तेवढी परवानगी आहे. आम्ही २५२ हेक्टर जमिनीची विचार करणार आहोत. जर तेथे मिनिरल्स आढळले, तर ती जमिन १००% घेण्यात येईल.

<u>**मुद्दा क्रमांक २ –**</u>

फक्त ९२ व्यक्तींना रोजगार देणार. पदाची वर्गवारी दाखविण्यात आलेली नाही.

<u>**उत्तर:-**</u>

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की संवर्गाप्रमाणे वर्गवारी करण्यात आलेली आहे – उच्च कुशल, कुशल, अर्धकुशल व अकुशल. आजच्या तारखेला जी कंपनीची रोजगार क्षमता आहे, ती नमुद करण्यात आलेली आहे. त्यामुळे ९२ व्यक्तींनाच नोकरी मिळेल.

<u>**मुद्दा क्रमांक ३ -**</u>

खाणीचे उत्खनन हे आठ वर्षे करणार, तर उर्वरीत नोकरी कुठे देणार?

<u>**उत्तर:-**</u>

आठ वर्षे नोकरी येथे देण्यात येईल, दुसरे मिनरल्स मिळाले, तर उत्खनन पुढे करण्यात येईल. त्यावेळी ती उर्वरित नोकरी ही चालू ठेवण्यात येईल.

<u>**मुद्दा क्रमांक ४ –**</u>

उत्खनन किती करणार याची माहिती नाही.

उत्तरः-

उत्खनन हे चुनखडीचे असून जर दुसरे मिनरल्स मिळाले, तर उत्खनन पुढे करण्यात येईल, त्यासाठी नवीन लोकांची गरज भासल्यास त्याची नियुक्ती करण्यात येईल. स्थानिकांनाच प्रत्येकवेळी रोजगारात प्राधान्य देण्यात येईल.

मुद्दा क्रमांक ५ –

विविध क्षेत्रातील तीन गावांना सीएसआर फंड कसा देणार याची खुलासा नाही.

उत्तर -

शासनाच्या नियमांप्रमाणे सीएसआर निधीचे वाटप गावातील गरजांनुसार करण्यात येईल. सीएसआर निधी हा स्थानिक पातळीवरच वापरण्यात येईल.

मुद्दा क्रमांक ६ -

मायनिंग करताना सुरक्षा भिंत बांधणार की खुली मायनींग करणार?

उत्तर - सूरक्षा भिंत मायनीग व डपिंग यार्डला बांधणार.

मुद्दा क्रमांक ७ –

देगाव ते मूकूटबन आपण ३० टन वाहतूक करणार. त्यासाठी नविन रस्ता बांधणार आहात का?

उत्तर -

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की याचे उत्तर देण्यात आलेले आहे. सदरहू सार्वजनिक रस्त्याचे सबलीकरण, दुरूस्ती करण्यात येईल व जरुरु पडल्यास रुंदीकरणसुध्दा करण्यात येईल.

मुद्दा क्रंमाक ८ -

रस्ता वापरल्याने खराब होत जाईल, त्याची वेळोवेळी दुरूस्ती.

उत्तर -

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की याचे उत्तर देण्यात आलेले आहे. दुरूस्ती, सबलीकरण व जरुर पडल्यास रुंदीकरण करण्यात येईल.

मुद्दा क्रमांक ९ –

५० वर्षे लीज क्षेत्र व त्यात पूर्ण वेळ नोकरी व सीएसआर पूढील ५० वर्षे देणार का, याबाबत खुलासा.

उत्तरः-

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की याचे उत्तर देण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत

आम्हांला हे भूखंड महाराष्ट्र शासनाच्या ई-लिलावात प्राप्त झालेले आहेत. आजच्या तारखेला विस्तार ७०-८० हेक्टर पर्यंतच जेथे मिनरल्स आहेत, तेवढी परवानगी आहे. आम्ही २५२ हेक्टर जमिनीची विचार करणार आहोत. जर तेथे मिनिरल्स आढळले, तर ती जमिन १००% घेण्यात येईल.

<u>मुद्दा क्रमांक १०</u>

सुप्रीम कोर्टाने कंपनील ०.१६ मध्ये रोजगारमध्ये पेज ३५ मध्ये प्रस्ताव दिला. तो मुद्दा होणार नाही याची हमी कंपनी देणार का?

उत्तर - तसे होणार नाही. मात्र शासनाने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे तंतोतंत पालन करण्यात येईल.

<u>मूद्दा क्रं. ११</u>

भाव कमी असून एलएआरआर २०१ मधील तरतूदींनूसार देणार याचा खुलासा नाही.

उत्तर -

आम्ही मूळ मालकाबरोबर समोरासमोर वाटाघाटी करणार आहोत.

<u>मूद्दा क्रं. १२</u>

*झाडांची नावे यावरून* पर्यावरण संवर्धन होणार नाही.

उत्तर -ज्या प्रजातीची झाडे लावणार, त्यास पर्यावरण तज्ज्ञांकडून प्रमाणीत करण्यात आलेली आहेत.

<u>मूद्दा क्रं. १३ -</u>

उपरोक्त जिल्हा पलसोडा लीज असताना खाजगी खाण अवराळा येथे कशासाठी घेत आहेत

<u>उत्तर -</u>

जो कच्चा माल लागतो, तो विकत घ्यावा लागतो. तो कच्चा माल असून ते ऑफीशियल खरेदी करण्यात येत आहे. त्यासाठी लागणारे सर्व शासकीय परवाने आम्हांला प्राप्त आहेत.

<u>मुद्दा क्रं. १४ —</u>

तशी परवानगी घेण्यात आलेली आहे का, व त्यातील अटी व शर्तीचा उल्लेख नाही.

अटी व शर्तीचे तंतोतंत पालन करण्यात येईल.

<u>मुद्दा क्रं. १५ —</u>

वन विभागाला देणार याची माहिती दिलेली आहे.

उत्तरः-

शेड्यूल्ड १ चा आराखडा वन विभागास देण्यात आलेला आहे. प्रकल्प परीघात कुठलेच वन्यप्राणी आढळून आलेले नाहीत. मात्र प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघाच्या बाहेरचे नियोजन वनविभागास सादर करण्यात येईल.

मुद्दा क्रं. १६-

ही माईन्स कधी सुरू होणार व तीचा आठ वर्षाचा काय कालावधी राहील? यानंतर जमिन कंपनीची, मालकाची, शेतकऱ्यांची याचा खुलासा नाही.

उत्तर-

मायनीग प्लॅनमध्ये याबाबत माहिती दिलेली आहे. त्यानंतर आम्ही अभ्यास करु. पर्यावरण अनुमती परत घ्यावी लागली तर ती परत घेऊ.

उत्तर -

केंद्र शासन परवानगी देताना मायनिंग प्लॅन देते. त्या अटी व शर्ती पाळण्यात येतील.

मुद्दा क्रं. १७ –

५०० मीटर अंतरावर असल्याने शाळेला ब्लास्टींगची माहिती देणार, पण शिक्षणात एकाग्रता भंग, अडथळा यावर उपाय योजना काय?

उत्तर - शाळेच्या वेळेत ब्लास्टींग करणार नाही.

मुद्दा क्रं. १८ -

ब्लास्टींगमुळे होणाऱ्या कंपनामुळे परिसरातील गावातील भीतींना तडे जाणार व पाण्यातील जीवजंतू नष्ट होणार. त्यावर उपाययोजना.

उत्तर -

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की याबाबत तज्ज्ञांकडून किती लांब कंपने जातील याचा अभ्यास करण्यात येईल. त्यानुसारच आमची ब्लास्टींगची डिझाईन होते. येथे डिले बेस्ड ब्लास्टींग आहे. त्यामुळे कंपने ही लांब वर जाणे हे शक्यच नाही.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सूचना, प्रश्न विचारण्याचे असल्यास हात वर करण्याचे आवाहन केले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी नविन ग्रामस्थ आले, त्यांना त्यांचे म्हणणे मांडावयाचे आहे काय याबाबत विचारणा केली. ज्यांना विचारायचे, त्यांनी हात वर करावा, माईक त्यांच्यापर्यंत येईल.

**लेखी निवेदन क्रमांक – ५ -**

**श्री सतीश विनायक राजूरकर, श्री अरविंद महादेव, श्री प्रमोद महादेव कांबळे, रविंद्र मारुती कानघाटे -**

**मुद्दा क्रं. १ –**

पाण्याची पातळी खाली जाणे –

प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की पाण्याची पातळी खाली जाण्याचा संबध नाही.

**मुद्दा क्रं. २ –**

ग्राऊंड वॉटर रिचार्ज –

**उत्तर -**

येथे संपूर्ण Hydrological Study करण्यात आलेला आहे. Catchment area मधील पाणी पिट्समध्ये सोडण्यात येईल. ते भूगर्भात सिपेज म्हणून जाईल. त्याला मोजून आम्ही पाणी सोडण्यात येईल. त्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी ही अबाधित राहिल. त्यात कमतरता येणार नाही. प्रकल्पापासून नाला ८०० मीटर अंतरावर आलेला आहे.

समन्वयक यांनी नाल्याची लांबी विचारली. प्रकल्प अधिकार यांनी सांगितले की नाला वळविणे (Nalla Diversion) आम्ही करणार नाही. त्यावेळी समन्वयक यांनी प्रकल्पातील ओ.बी. नाल्यात जाऊ नये असे मत मांडले. प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की त्यासाठीच ओ.बी. डंपिंग यार्ड हे १५० मीटर अंतरावर ठेवणार आहे. त्याचा स्लोप ठेवणार असून, रिटेशन वॉल बांधण्यात येईल. कुठल्याही परिस्थितीत ओ.बी. नाल्यात जाणार नाही.

**मुद्दा नं. ३ –**

शेतकऱ्यांचे बोअरवेल बंद पडणे –

**उत्तर -** शेतकऱ्यांचे बोअरवेल बंद पडण्याची शक्यता नाही. पण आमच्यामुळे जर बोअरवेल बंद पडले तर आम्ही मोबदला १००% देण्यात येईल. ते जर सिध्द झाले तर त्यांना दुसरी बोअर करुन देण्यात येईल.

येथे ब्लास्टींग व वाहतुक आहे, त्यामूळे धुळाचा त्रास नाही. येथे मुख्य मुद्दा fugitive emissions चा आहे. त्यावर नियंत्रणासाठी योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील. त्यामुळे fugitive emissions हे मानकाच्या पातळीत राहील.

**मुद्दा नं. ४ –**

धुळीमूळे पीकांवर परिणाम त्यामुळे उत्पादन कमी होणे –

उत्तर -

रस्त्यावर पाणी शिंपडणे हा आमचा नियमित उपक्रम राहिल. जेथून आमची वाहने जातात, त्या रस्त्यांवर पाणी शिंपडण्यात येईल, त्यामुळे पीकांवर परिणाम होणार नाही.

मुद्दा नं. ५ –

त्यामुळे स्थानीक बेरोजगार होणार -

प्रदूषण कमी झाल्याने येथील सर्व स्त्रोत हे प्रकल्पासाठी वापरण्यात येतील, त्यामुळे प्रकल्पात वाढ होईल व बेरोजगारी ही कमी होईल.

मुद्दा नं. ६ –

वरिल नुकसानीचा विचार करता खाण सुरु होण्याआधी संबंधित शेतकऱ्यांच्या होणाऱ्या नुकसानीबाबत योग्य कार्यवाही करावी.

बोअर वेल बंद होणे, धुळीमूळे नुकसान दरवर्षी देण्यात यावी.

रोजगारात प्राधान्य देण्यात यावे.

उत्तरे देण्यात आलेली आहेत.

१२) श्री निलेश गुलाब बोंडे, राहणार-दहेगाव, तालुका-वणी, जिल्हा-यवतमाळ-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आताच आपण सांगितले की ब्लास्टींमुळे बोअर वेल बंद झाल्यास आम्ही नुकसान भरपाई देऊ. पण मुकूटबन येथे एक प्रकरण या कंपनीचेच झाले की त्या शेतकऱ्यास २-३ वर्षे कोर्टात भांडावे लागले. तेव्हा या कंपनीच्या व्यवस्थापनाने त्या संबंधित शेतकऱ्यास मोबदला देण्याचे मान्य केले. | प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की संबंधित शेतकऱ्याची बोअरवेल आमच्यामुळे बंद झाली हे प्रमाणित झाल्याशिवाय आम्ही मोबदला कसा देणार? त्यासाठी आम्हांला तज्ज्ञ व्यक्तीची सल्ला घेण्यासाठी नियुक्ती करावी लागली होती. शेजारधर्म म्हणून आम्ही संबधित शेतकऱ्यास मोबदला दिलेला होता. संबंधित शेतकऱ्याची बोअर आम्ही परत चालू केली. |
| २) | आक्षेप नोंदविला की ब्लास्टींगमुळे भूगर्भातील प्रवाह हे बदलतात. | प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्पाबाबत सर्वेक्षण करताना भूगर्भातील प्रवाह, पाणी यांचा संपूर्ण अभ्यास केलेला आहे. आमची स्फोटके वापरण्याची क्षमता ही कमी आहे. आमचे सरफेस मायनिंग असते. को-जनची खाण व सरफेस मायनिंग यातील स्फोटके यात फरक |

| | | |
|---|---|---|
| | | आहे. तरीही कोणाचे नुकसान झाल्यास १००% मोबदला देण्यात येईल. |
| ३) | आक्षेप नोंदविला की याची चौकशी होईल | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की असे झाल्यास दोन महिन्यात त्याचे निवारण करण्यात येईल. |
| ४) | चुनखडी वाहतुक करणारा रस्ता चौपदरी पाहिजे. अस्तित्वात असलेल्या सार्वजनिक रस्त्यावरुन बारा टनाची वाहतुक करता येणार नाही. प्रकल्पाचे ट्रक तीस टनाची वाहतुक करतील. यांनी प्रथम रस्ता केला नाही तर, प्रकल्पाच्या वाहतुकीमूळे अपघात व्हायचे प्रमाण जास्त होईल. तर अपघातात स्थानीक शेतकरी,स्थानीकांचे निधन झाल्यानंतर प्रकल्प प्रवर्तक रस्ता दुरुस्त करणार आहेत का? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की सदरहू रस्त्याची दुरुस्ती, सबलीकरण आणी जरूर भासल्यास रुंदीकरण करण्यात येईल. नंतरच वाहतुक चालू करण्यात येईल. |
| ५) | आता प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सदरहू रस्त्याची दुरुस्ती, सबलीकरण आणि जरूर भासल्यास रुंदीकरण करण्यात येईल, पण अगोदर यांनी रस्त्यासाठी पायाभरणी करणे अपेक्षित आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की सदरहू रस्त्याची दुरुस्ती, सबलीकरण आणी जरूर भासल्यास रुंदीकरण करण्यात येईल. नंतरच वाहतुक चालू करण्यात येईल. |
| ६) | प्रकल्पातील धूळमूळे रस्त्याच्या दोन्ही बाजूस असणा-या शेतीच्या पीक उत्पादनावर परिणाम होणार आहे. उत्पन्न कमी होईल, याची भरपाई कोण देणार? | आमच्याकडून नुकसान भरपाई झाली हे सिध्द झाल्यास त्यास मोबदला देण्यात येईल. |
| ७) | येथे शेतजमिन अधिग्रहित केल्याने हजारो लोक बेकार होतील. फक्त ९२ लोकांना नोकऱ्या देणार असेल तर ही कंपनी मालकाच्या फायद्याची आहे की शेतकऱ्याच्या फायद्याची आहे? | प्रकल्पात रोजगारची क्षमता ही ९२ व्यक्तींचीच आहे. त्यांचा रोजगार चालू राहण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतील. प्रकल्पात स्थानीकांनाच रोजगार देताना प्राधान्य देण्यात येईल. त्याचप्रमाणे स्थानिक सक्षम होण्यासाठा कौशल्यविकास कार्यक्रम हाती घेण्यात येईल. |
| ८) | प्रकल्पग्रस्त गावात सीएसआर निधीतर्गत कुठली कामे हाती घेण्यात येतील? | गावातील विविध सामाजीक कामे हाती घेण्यात येतील. त्यासाठी ग्रामपंचायत व गावातील प्रतिष्ठित नागरिकांचा सहभाग घेण्यात येईल. |
| ९) | त्या गावात प्रकल्पाच्या धुळीमुळे जे नुकसान होणार आहे, त्यामुळे स्थानिकांना अनेक आजारांना तोंड द्यावे लागेल. त्यासाठी उपाययोजना. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रथम प्रदूषण होणार नाही याची प्रथम काळजी घेण्यात येईल. तेथील हेल्थ स्टेटस कसा सुधारेल हे प्रथम पाहण्यात येईल. |

लेखी सूचना क्रमांक — ६ -

डॉ महेंद्रिसह धावडे व बाळासाहेब रास्ते:-

मुद्दा क्रं. - १

सद्या वणी परिसरात ज्या कोळसा खाणी सूरू आहेत, त्यांची वाहतुक बेशिस्त आहे आणि त्यांच्यामूळे पहिलेच प्रदूषण होत आहे. आणि या प्रकल्पामुळे त्यात भर पडणार आहे. वृक्षांची कमी झालेली संख्या, वाढती उष्णता यामुळे मानवी जीवनावर विपरीत परिणाम झालेला आहे. तो वाढणार नाही का?

उत्तर -

त्याची काळजी घेण्यात येईल. रस्त्यावरुन पाणी शिंपडणे, आजूबाजूच्या परिसरात हरित पट्टा विकसित करण्यात येतील. या प्रकल्पामुळे कुठलाही दुष्परिणाम होणार नाही.

मुद्दा क्रं. - २

झरी झामणी तालुक्यातील सावल, रुईकोट, पारडी या गावातील परिसरातील झाडे.साठे आणि शेतजमिनी मानवी या सर्वांची काळजी घेणे गरजेचे आहे. मानवी जीवन त्यामुळे धोक्यात येणारे आहे.

उत्तर -

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की सुरवातीस सादरीकरणात पर्यावरण व्यवस्थापन योजना सविस्तरपणे सांगण्यात आलेला आहे. त्याचे तंतोतंत पालन करण्यात येईल. याप्रकारची परिस्थिती उद्भवण्याची शक्यता नाही.

मुद्दा क्रं. — ३ -

जीवजंतुंची सर्वनाश करुन भूगर्भातील पाणी पातळी संपवून या परिसरातील शेतकऱ्याला पोरके करु नये. ही एक पर्यावरण कार्यकर्त्याची आपल्याकडे मागणी आहे.

सूचनेची नोंद घेण्यात आली.

लेखी निवेदन क्रमाक — ७

WELFARE FOR PEOPLE'S FOUNDATION — K. Sree Devi, President -

मी वरील प्रकल्पाला बिनशर्त पर्यावरण मंजुरी देण्याची शिफारस करत आहे. आम्ही तुमच्याशी वैयक्तिकरित्या समर्थन करू इच्छितो आणि सहमत होऊ इच्छितो. व्यवस्थापन प्रस्तावित

प्रकल्प वरील स्थानिक लोकांसाठी फायदेशीर ठरेल कारण अधिक पायाभूत सुविधा आणि सुधारणेमुळे गावाच्या परिसरात रस्त्यांचे जाळे उपलब्ध होईल.

प्रमुख वस्ती भागात पाइपलाइन बांधकाम टाळण्यात यावे.

उत्तर -

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की वसाहती, निवासी भागात पाईपलाईन बांधण्याचे नियोजन नाही.

मुद्दा क्रमांक - २

हेल्थ कार्ड स्थानिक लोकांना पुरवते आणि खाणीत काम करणाऱ्या पुरुषांना मूलभूत सुविधा पुरवतात. लोकांच्या हितासाठी सीएसआर फंड.

उत्तर -

ज्याप्रमाणे मंजूरी प्राप्त झालेली आहे, त्यानुसार सीएसआर निधी हा स्थानीक गावातील योजनांसाठी खर्च करण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्वांना परत सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले.

१३) श्री प्रमोद लाडे, गाव - डोंगरगाव भिलोडी, तालुका-वणी, जिल्हा-यवतमाळः-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझ्या भावाची येथे शेती आहे. येथे खडीकरण दाखविलेले आहे. पण येथे डोलोमाईनचा गोटा ३०० फूट आहे. मात्र येथे खडीकरण दाखविण्यात आलेले आहे. तर याची किंमत/valuation शेतकऱ्याला कसे मिळेल हा प्रश्न आहे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आम्ही मूळ मालकाशी वाटाघाटी करुन जमिन अधिग्रहित करण्यात येईल. दुसऱ्या कुठल्याही मार्गाने जमिनी खरेदी करण्यात येणार नाही. जमिनीची किंमत ही दोघांच्या संमतीनेच मंजूर करण्यात येईल. सर्व शासकीय परवानग्या मिळाल्यानंतरच जमिन खरेदीची प्रक्रिया सुरू करण्यात येईल. |
| २) | येथे बेरोजगार मूले आहेत. तर हा दर होऊ शकले हे तरी सांगण्यात यावे. तसेच शेतकऱ्याला त्याचा योग्य तो मोबदला मिळाला पाहिजे. कोणाची फसवणूक, घात झाला नाही पाहीजे. | सर्व शासकीय परवानग्या मिळाल्यानंतरच जमिन खरेदीची प्रक्रिया सुरू करण्यात येईल. जमिनीची किंमत ही दोघांच्या संमतीनेच मंजूर करण्यात येईल. |
| ३) | तेथे डोलामाईटचा गोटा आहे. आपण चुनखडी सांगतात. चुनखडी व डोलामाईटचा दर हा वेगळा असतो. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगीतले की आम्हांला सिमेंट बनवायचे आहे, त्यामूळे आम्हांला चुनखडी देण्याची भारत सरकारची इच्छा नाही. |

| | | |
|---|---|---|
| | | आम्हांला डोलोमाईची गरज नाही, म्हणून ती आम्ही घेणार नाही. भविष्यात जर डोलोमाईटची गरज भस्ल्यास डोलोमाईट आम्ही नियमीत पणे घेण्यात येईल. |

१४) <u>श्री बाबाराव मारुती काकडे, राहणार-डोंगरगाव, तालुका-वणी,जिल्हा-यवतमाळ:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझी बोअर वेल ही कंपनीला लागून आहे. कंपनी सुरू झाली की माझा बोअर आटेल. | प्रकल्प प्रवर्तक यांनी हमी दिली की प्रकल्पामूळे बोअर खचले जाणार नाही. बोअर खचू नये म्हणून उपाययोजना करण्यात येतील. येथे बोअर वेलपासून संरक्षित अंतर पाळण्यात येईल. मात्र काही नुकसान झाल्यास व ते आमच्या प्रकल्पापासून झाल्याचे सिध्द झाल्यास त्याचा मोबदला देण्यात येईल. |

१५) <u>श्री विनोद मीलमिले, राहणार-डोंगरगाव,तालुका-वणी, जिल्हा-यवतमाळ:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मा. जिल्हाधिकारीसाहेब, येथे सर्व्हे नंबर घेतले, पण सिरियल नंबर घेतले नाहित. अधेमध्ये काही सर्व्हे नंबर टाकून घेतलेले आहेत. माझा सर्व्हे नंबर ३६ आहे. तर त्यांनी ३५ घेतला व तीन गॅप घेतले. ३९ नंबरचा घेतला, तर आम्हांला काय मोबदला देण्यात येणार आहे? | सुप्रीम कोर्टाने सांगीतल्याप्रमाणे महाराष्ट्र सरकारव्दारे खाणीचे क्षेत्र ई-लिलावाने मिळालेले आहे. तर त्याचे कुठले सर्व्हे नंबर घ्यावेत, कुठले सोडावे हे महाराष्ट्र शासनाने केलेले असून आम्हांला महाराष्ट्र शासनाने सर्व्हे नंबर दिलेले आहेत. महाराष्ट्र सरकारने ही माईन्स दिलेली आहे. त्या सर्व्हे नंबरवरच काम करण्याची परवानगी आम्हांला आहे. कुठला सर्व्हे नंबर सोडावा किंवा घ्यावा, यास कंपनी जबाबदार नाही |
| २) | माझे शेत हे टॉवरच्या खाली आहे. तसेच बाजूचा भूखंड घेतल्याने आमचे जाण्याचे रस्तेच बंद होणार आहेत. | जर आपल्या भूखंडांत खनिज असेल, तर त्यासाठी वेगळी प्रक्रिया आहे. पण कंपनी स्वतःहून काहीही करु शकत नाही. इलेक्ट्रीक |

| | | |
|---|---|---|
| | | पोल लावणे यात कंपनीचा काहीही सहभाग नाही. |
| ३) | आमच्या कडे तीन एकर जमीन आहे. आम्ही काय करावे? कारण आमचा जाण्यायेण्याचा मार्ग बंद होणार आहे. तुम्ही भोवतालची जमीन घेतली व आम्हांला मध्येच सोडलेले आहे | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगीतले की जाण्यायेण्याचा आपला मूलभूत अधिकार आहे. त्यामुळे आपणास जाणेयेण्यासाठी जागा देणे हे शासनास व कंपनीस बंधनकारक आहे. अध्यक्ष यांनी प्रकल्प प्रवर्तकांना सूचना दिली की संबंधित व्यक्तीच्या सर्व्हे नंबर लक्षात घेऊन त्यांच्या जाण्यायेण्याचा रस्ता देण्याची निश्चिती करण्यात यावी. |
| ४) | जिल्हधिकारी साहेब, मी माझी व्यथा लेखी देऊ शकतो काय? | अध्यक्ष यांनी सांगितले की आपण लेखी देऊ शकता. आज पर्यावरणविषयक जनसुनावणी आहे. आपण मांडलेल्या सर्व मूद्यांची नोंद घेण्यात येत असून त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल. तर त्याव्यतिरिक्त कोणालाही सूचना, आक्षेप नोंदवायचे असल्यास जिल्हाधिकारी कार्यालय-यवतमाळ किंवा तहसील कार्यालय येथे संपर्क साधण्यात यावा. |

<u>लेखी निवेदन –क्रंमाक – ८ - श्री दीपक दिक्षित -</u>

वणी, मारेगाव येथे जे औद्योगिक क्षेत्र आहे, तेथील हवेची गुणवत्ता जास्त आहे, म्हणजे $PM_{१०}$ – २.५; NOx हे राष्ट्रीय मानकांपेक्षा अधिक आहे.

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी आवाहन केले की मागील बाजूस बसलल्या व्यक्तीं नुकत्याच आलेल्या आहेत. त्यांना त्यांची मागणी मांडावयाची असेल तर हात वर करण्यात यावा.

त्याशिवाय हे लेखी निवेदन चालू असेपर्यंत जे शासकीय अधिकारी आहेत, ते परत बाहेर उभ्या असलेल्या व्यक्तींना मंडपात बसून काम करण्याची विनंती करतील.

समन्वयक यांनी सांगीतले PM१० – २,५; NOx ची मर्यादा येथे ओलांडण्यात आलेली आहे. PM१० – २.५ पेक्षा जास्त व NOx व SO२ हे ८० पेक्षा जास्त आहे. त्यात आपल्या या प्रकल्पामुळे त्यात भर पडेल.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की परिसराचा बेसलाईन सर्वेक्षण हे करण्यात आलेले आहेत. हवा प्रदूषण प्रदूषके ही केंद्र शासनाने पारित केलेल्या मानकांच्या पातळीत आढळून आलेली आहे.

समन्वयक यांनी निवेदन वाचून दाखविले की –the parameters in various locations are not real but false.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की परिसराचे सर्वेक्षण करण्यात आलेले असून ते त्याचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. त्याचे सर्व पुरावे, फोटोज् हे ईआयए अहवालासोबत जोडलेले आहेत.

<u>मुद्दा नं. ३ –</u>

कार्यकारी सारांशमध्ये प्रकल्प प्रवर्तक यांनी कोणताही तपशील नमूद केलेला नाही.

उत्तर -

उपरोक्त सर्व माहिती आम्ही ईआयए अहवालासोबत सादर करण्यात आलेली आहे. सर्व आठ लोकेशन्स जल, हवा, माती यांची होती, ती सर्व माहिती ईआयए अहवालात जोडलेली आहे.

<u>मुद्दा क्रंमाक ४ -</u>

वायू उत्सर्जन प्रभावीपणे नियंत्रित करण्यासाठी आणि स्टॅक उत्सर्जनाचे निर्मूलन करण्यासाठी सर्व उपाययोजना करत नाहीत

या प्रश्नाचे उत्तर देण्यात आलेले आहे.

Pollution on Sponge Iron Plant –

आमचा कुठलाच प्रकल्प नाही.

<u>मुद्दा क्रमांक ५ -</u>

There shall be no monitoring of ground water levels and its available quantity will be deteriorated.

For residential area or Wani and Maregaon and nearby villages above the limits which is ५५ dBA for residential area,

७५ for industrial area, when did these activities will start, noise levels will go up.

ध्वनी पातळी ही पारित मानकांच्या मर्यादेत असते.

<u>मुददा क्रमाक -६</u>

Beyond the prescribed limits , the above project falls under Tipeshwar Corridor, therefore the proposed project will hamper the wild life.

सदरहू कॉरिडॉर हा हे आपणास चेक करण्यासाठी सोडण्यात आलेले आले.

सदरहू कॉरिडॉर हा प्रकल्प क्षेत्तातून जात नाही

**मुददा क्रमाक - ७**

ब्लास्टिंगसाठी, जमिनीच्या कंपनांच्या नियंत्रणासाठी कोणतेही शमन उपाय नाहीत.
याबाबतची सर्व माहिती ही सादरीकरणात सांगण्यात आलेली आहे.

**मुददा क्रमाक - ८**

रस्ते आणि संरचनेसह हरित पट्टा लागू करण्याचा प्रस्ताव आहे.

सादरीकरणात किती झाडे लावणार याची माहिती सादरीकरणात सांगितलेली आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनीआवाहन केले की कोणालाही म्हणणे मांडावयाचे असल्यास ती संधी आहे. त्यांनी सांगितले की मंडपाबाहेर असणाऱ्यांना जर कोणास बोलायचे असल्यास त्यासाठी पाच मिनिटे अवधी देण्यात येत आहे. ते आत येऊन बोलू शकतात, त्यास पाच मिनिटांचा अवधी देण्यात येत आहे. ३.५३ मिनीटे झालेली आहेत. ज्यांना त्यांचे म्हणणे मांडावयाचे असेल, त्यांना ती संधी देण्यात येत आहे व प्रकल्प प्रवर्तकाकडन यांस उत्तर देण्यात येईल. मध्यतरीच्या वेळेल मंडपात बसलेल्यांना काही सूचना, आक्षेप नोंदवायचा असल्यास तो ते नोंदवू शकतात. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की बैठकीस देशातून, महाराष्ट्र राज्यातून तसेच येथील प्रकल्पग्रस्त गावातून मोठ्या प्रमाणात लोक आलेली होती. सर्वांना बोलण्याची संधि देण्यात आलेली होती. लोकांना आपले म्हणणे मांडलेले आहेत. तरी शेवटची संधि सूचना, आक्षेप, विचार नोंदविण्यासाठी आहे. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की येथे विविध लोकांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी आपल्य सूचना, आक्षेप नोंदविलेले आहेत. बैठकीसाठी काही लेखी निवेदने प्राप्त झालेली असून त्यासही प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तरे दिलेली आहेत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की वारंवार लोकांना विनंती केल्यानंतरही कोणीही सूचना मांडण्यासाठी हात वर केलेला नाही. बैठकीत स्थानीक शेतकरी व इतर उपस्थित हे आपले म्हणणे मांडून निघून गेलेले आहेत. तरी स्थानीकांचे म्हणणे मांडणे पूर्ण झाले असे पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती समजते.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आज आरसीसीपीएल प्रायव्हेट कंपनी बीसीसीएल कंपनीने प्रकल्पाचे सादरीकरण प्रकल्प प्रवर्तकांनी केले. डोंगरगाव चुनखडी खाण, क्षेत्र २५२.३६ हेक्टर, स्थान – डोंगरगाव, दहेगाव आणि वेगांव या तीन गावात व यवतमाळ जिल्ह्यातील वणी व मारेगाव तालुक्यात आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी सादरीकरण केले. त्यांनतर जे लोक उपस्थित होते, त्यांच्यासमोर सादरीकरण झाल्यानंतर जे मुद्दे, प्रश्न

उपस्थितांनी विचारले, त्यांना उत्तरे प्रकल्प प्रवर्तक यांनी दिलेले आहे. बैठकीत प्राप्त झालेल्या लेखी निवेदनांना व याअगोदर प्राप्त झालेल्या लेखी निवेदनांना प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तरे दिलेली आहेत. यासोबत हे ही जाहिर करतो की आज सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत सूचना, आक्षेप मेलवर येत असतील, तर त्याची उत्तरे प्रकल्प प्रवर्तकांनी जनसुनावणीच्या इतिवृत्तासाठी द्यावे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की शासनाच्या नियमानुसार आजची जनसुनावणी लोकांना आगाऊ पूरेशी सूचना वर्तमानपत्रात देऊन, अधिसूचित शासकीय विभाग व गावस्तरावर पूरेशी सूचना देऊन व नंतर बैठकीत पूरेसा कालावधी देऊन जनसुनावणी प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. ज्या लोकांना म्हणणे मांडावयाचे होते, त्यांनी सूचना, आक्षेप नोंदविले असून त्यास प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तरे दिलेली आहेत. बैठकीचे इतिवृत्त अध्यक्ष यांच्या संमतीने, अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, लेखी सूचना/आक्षेप व त्यांना प्रकल्प प्रवर्तक यांनी दिलेली उतरे मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत योग्य तो निर्णय घेईल. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व अध्यक्ष या नात्याने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

समन्वयक. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी अध्यक्ष व सदस्या, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती व सर्व उपस्थितांचे आभार मानले.

प्राप्त ----१४------ झालेली लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| **(उमाशंकर भादुले)** | **(सौ. हेमा देशपांडे)** | **(अमोल येडगे, भाप्रसे)** |
| समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ |